
# स्वतंत्र ब्रह्मदेश



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय को.वा.
दा. क. २७६८

IRBK-0102768
IRBK-0102768

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

IRBK-0102768

चित्रशाळा प्रकाशन

म. ग्रं. सं. ठाणें.


अ. क्र. २७६८ नों दि ........

वि. ....... का. वा.

जरी सत्तीचे लष्करी व वैमानिक तळ ठेवण्यांत आले नसले तरी बर्मा ऑईल कंपनी, इरावती फ्लोटिला कंपनी व स्टील ब्रदर्स या तीन कंपन्यांच्या हातीं ब्रम्हदेशाचें सर्व खनिज उत्पादन, आयात-निर्यात व्यापार, उद्योगधंदे व वहातुक आहे. त्यामुळें ब्रम्हदेश राजकीय दृष्टया म्हणजे वरकरणीं स्वतंत्र झालेला दिसला तरी आर्थिक व औद्योगिकदृष्टया तो अजून परतंत्रच आहे. या गुलामगिरीचे पाश तोडून तो जेव्हां सर्व उद्योगधंदे व व्यापार आपल्या ताब्यांत घेईल तेव्हांच तो स्वतंत्र झाला असें म्हणतां येईल.

दोन महायुद्धांच्या आघातामुळें ब्रम्हदेश अत्यंत उध्वस्त व छिन्नविच्छिन्न झालेला आहे, त्याची पुनर्घटना करून व्यापाराची नवी घडी बसवावयाची आहे, उद्योगधंद्यांची उभारणी करावयाची आहे. ब्रम्हदेश हा मूळचा कितीही सधन, समृद्ध व सुपीक असला तरी ब्रम्हदेशाचीं सर्व व्यापारी व आर्थिक सूत्रें ब्रिटिशांच्या हातीं असल्यामुळें राष्ट्राची पुनर्घटना करणें सोपें नाहीं. शिवाय युद्धा-मुळें उध्वस्त झालेल्या ब्रम्हदेशाच्या पुनर्घटनेसाठीं ब्रिटिश सरकारनें लादलेलें ८ कोटी ७० लक्ष पौंडांचें कर्ज त्याच्या डोक्यावर आहे. अशा अनेक संकटांतून व अडचणींतून ब्रम्हदेशाला मार्ग काढा-वयाचा आहे. ब्रम्हदेशाच्या घटनापरिषदेनें देशांतील उद्योग-धंद्यांच्या राष्ट्रीकरणाचा ठराव केलेला असल्यामुळें ब्रिटिशांचें आर्थिक वर्चस्व यापुढें फार काळ टिकणें शक्य नाहीं. हें ओळखून ब्रिटिशांनीं ब्रम्हदेशांतून काढतें पाऊल घ्यावें हें उचित होईल.

ता. ४ जानेवारी १९४८ रोजीं सकाळीं ११ वाजून ५६ मिनिटांनीं ब्रम्हदेश स्वतंत्र झाला आहे. तो आपल्या कर्तृत्वानें लव-करच संपूर्ण स्वातंत्र्य संपादन करील अशी आशा वाटते.—**लेखक.**



ब्रम्हदेशाची घटनापरिषद

१९४६ च्या जुलैमध्यें परिषदेचें काम सुरूं झालें.



जनरल ऑँगसान

ब्रह्मी स्वातंत्र्याचा निर्माता.

ब्रह्मदेशाला मयूरपक्षांचा देश असें म्हटलें जातें. कारण मोर हा ब्रह्मदेशाचें ध्वजचिन्ह किंवा प्रतीक होय. इंग्लंडचा जसा सिंह, जर्मनीचा किंवा अमेरिकेचा गरुड, फ्रान्सचा कोंबडा, रशियाचें अस्वल, ऑस्ट्रेलियाचें कांगरू अथवा हिंदुस्थानचा हत्ती, त्याच-प्रमाणें ब्रम्हदेशचा मोर होय. ब्रह्मदेश हा जसा मयूरपक्षांचा देश आहे त्याप्रमाणें उंच उंच पॅगोडा ऊर्फ बुद्धमंदिरें, तांदुळाचीं प्रचंड खाचरें, भरगच्च जंगलें, तेलाच्या विहिरी व खनिज द्रव्यांच्या खाणी यांचाही तो देश आहे. हिंदुस्थान व चीन या दोहोंच्या मध्यें वसलेलें हें द्वीपकल्प त्यांच्याच संस्कृतींत वाढलेलें आहे व त्यांच्याइतकेंच तें प्राचीन आहे. ब्रह्मदेशांतला बुद्धधर्म हिंदुस्थानांतून आला व चीनमधून मंगोलियन वंश आला. या दोहोंचें संमिश्रण

म्हणजे आजचा ब्रम्हदेश होय. ब्रह्मदेशाची संस्कृति घडविण्यांत चीनचा थोडासा भाग असला तरी बहुतेक भाग हिंदुस्थानाचाच आहे हें कोणालाही निर्विवादपणें कबूल करावें लागेल.

हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश यांचा संबंध फार जुना आहे. इतका कीं इसवी सनाच्या पांचव्या शतकांत हिंदी लोक प्रथम ब्रह्मदेशांत आले. गेलीं पंधराशें वर्षें निकटचा शेजारी या नात्यानेंच नव्हे तर भारतीय संस्कृति व बुद्ध धर्म यांच्या प्रचारार्थ हिंदी लोक ब्रह्मदेशांत येऊन दाखल झाले. पण ते तेथेंच थांबले नाहींत. ते पुढें सयाम ऊर्फ थायलंड, फ्रेंच इंडोचायना, कांबोज ऊर्फ कांबोडिया, आनाम, मलाया, जावा ऊर्फ यवद्वीप इत्यादि पूर्व आशियांतल्या दूरदूरच्या प्रदेशांत गेले व तेथें त्यांनीं आपल्या भारतीय संस्कृतीची प्रस्थापना केली. या संस्कृतीचे अवशेष आजही तेथें पहावयास सांपडतात. पौराणिक कथाकल्पना, रामायण-महाभारतांतल्या गोष्टी, नागपूजा इत्यादि गोष्टी जावा-सुमात्रा बेटांत आजसुद्धां प्रचलित असलेल्या आढळतात. ब्रह्मदेशावर ब्राह्मणी ऊर्फ वेदकालीन संस्कृतीची छाप म्हणण्यासारखी बसली नाहीं; पण बुद्धानें सुरू केलेला बौद्ध धर्म मात्र तेथें रुजला, त्याचा जिकडे तिकडे प्रचार झाला. त्यामुळें आज तिबेट, चीन व सयाम या देशांप्रमाणेंच ब्रम्हदेश हा बुद्धधर्मीयांचा देश आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सांस्कृतिक दृष्ट्या ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांचा जो संबंध आहे तो फार पूर्वापार आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील द्राविडी सावकार व तेलगू व्यापारी यांचें ब्रह्मदेशाशीं दळणवळण सुरू झालें तत्पूर्वींच भारतीयांनीं संस्कृतीच्या क्षेत्रांत ब्रह्मदेशावर आपलें वर्चस्व संपादन केलें होतें. ब्रह्मदेशांतला बौद्ध धर्म हा हिंदुस्थानांतून आला त्याप्रमाणें पाली

भाषा व भारतीय शिल्पकला यांचेंही आगमन झालें. पेगन या ठिकाणीं प्रचंड देवालयांचे व वास्तुशिल्पांचे आज जे अवशेष दृष्टीस पडतात त्यावरून हें मंदिरशिल्प शुद्ध भारतीय स्वरूपाचें आहे याची खात्री पटते.

समुद्रमार्गामुळें हिंदुस्थानाच्या पूर्वकिनाऱ्यावरील व्यापाऱ्यांनीं ब्रम्हदेशाशीं व्यापारी दळणवळण सुरू केलें व तेथें वसाहती करण्यास प्रारंभ केला. पुढें कित्येक वर्षें मागासलेल्या ब्रम्हदेशांत हिंदी लोकांचें फार मोठें वर्चस्व होतें. तेथलि राज्यकारभारांत व व्यापारांत हिंदी लोकांनीं इतकें बस्तान बसविलें होतें कीं ब्रम्ही लोकांना त्याचें पुढें वैषम्य वाटूं लागलें व जागृत झालेल्या सुशिक्षित ब्रम्ही लोकांनीं हिंदी लोकांना हाकून लावण्याची भाषा सुरू केली. इंग्रज राजवटींत तांदुळाचें उत्पन्न वाढविण्यासाठीं असंख्य हिंदी शेतमजूर आणण्यांत आले होते, त्यामुळें ब्रम्ही लोकांचा जळफळाट होणें स्वाभाविक होतें. एक कोटि ६८ लक्ष लोकसंख्या असलेल्या ब्रम्हदेशांत आज एकूण हिंदी लोक सुमारें १० लक्ष आहेत, म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या मानानें ते शें. ६ इतके आहेत.

राजकीय लढे व राजकीय सुधारणा या बाबतींत ब्रम्हदेशानें हिंदुस्थानचा कित्ता गिरवला म्हणूनच हिंदुस्थानच्या पाठोपाठ ब्रम्हदेशाला स्वातंत्र्य मिळूं शकलें. १९३७ पर्यंत हे दोन्ही देश एकाच ब्रिटिश साम्राज्याखालीं नांदत असल्यामुळें परस्परांच्या सुखदु:खाबद्दल परस्परांना सहानुभूति वाटे. हिंदुस्थानांत कॉंग्रेस स्थापन झाल्या दिवसापासून स्वराज्याच्या मागणीला ब्रम्ही राष्ट्रवाद्यांचा पाठिंबा असे. बंगाल्यांत सुरू झालेल्या क्रांतिकारक चळवळींत ब्रम्ही तरुणांचा कांहीं भाग होता. म. गांधींनीं सुरू केलेल्या असह-

कारितेच्या कोणत्याच चळवळींत ब्रम्हदेशानें भाग घेतला नसला तरी कॉंग्रेसला नियमितपणें ब्रम्हदेशाचे प्रतिनिधि येत असत. ब्रम्ही राष्ट्रवाद्यांच्या निकराच्या मागणीमुळें ब्रम्हदेश विभक्त झाल्यापासून मात्र या दोन देशांचा संबंध पुष्कळच तुटला. तथापि ब्रिटिश गुलामगिरींत खितपत पडलेल्या आपल्या शेजारच्या राष्ट्राबद्दल हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांना सदैव सहानुभूति वाटत असे. हिंदी राष्ट्राप्रमाणेंच हा देशहि परकीयांच्या गुलामगिरींतून मुक्त झाला पाहिजे अशी त्यांची मनोभूमिका होती.

वर्ण व वंश या दृष्टीनें चिनी, तिबेटी व आनामी लोकांशीं ब्रम्ही लोकांचें साधर्म्य आहे. चीनमध्यें ब्रम्ही लोकांना मिन म्हणतात. इरावती, सितांग व साल्वीन या नद्यांच्या खोऱ्यांचा प्रदेश म्हणजे सयामी, माघ, आराकानी, तेलंगी, कांबोडियांतले ख्मेर, मॉन इत्यादि अनेक वंशीयांच्या स्वामित्वाचें क्षेत्र आहे. हा देश कोणाच्या मालकीचा असावा यासंबंधीं तेथें नेहमीं भांडणें होत. आठव्या शतकाच्या प्रारंभापासून तेथें ब्रम्ही राजे राज्य करूं लागले, पण १७५७ च्या सुमारास ब्रम्हदेशांत ब्रिटिशांचें पाऊल पडतांच थोड्याच अवधींत हे ब्रम्ही राजेहि राज्यभ्रष्ट झाले व इंग्रजांनीं सर्व सत्ता बळकावली. म्हणजे जवळ जवळ गेलीं १०० वर्षें ब्रम्हदेशावर ब्रिटिशांचें वर्चस्व आहे.

## प्राचीन इतिहास : : २

ब्रम्हदेशाचा इतिहास हिंदुस्थानाप्रमाणेंच फार प्राचीन आहे. ब्रम्ही संस्कृतींत भारतीय व चिनी संस्कृतींचें मिश्रण आहे. चीन-प्रमाणें दोन हजार वर्षांचा ब्रम्हदेशाचा इतिहास उपलब्ध नाहीं, पण उत्तर ब्रम्हदेशांत व सध्यां जेथें शान संस्थानें आहेत तेथें इ.स. ९० मध्यें शान नांवाचा राजा राज्य करीत होता असा इतिहास सांपडतो. या राजवंशानें इ. स. २३० पर्यंत राज्य केलें. याच सुमारास उत्तर ब्रम्हदेशांत इरावतीच्या कांठीं तगोंग येथें हिंदुस्थानां-तील हिंदु लोकांची मोठी वसाहत निर्माण झाली होती. ही वसाहत उत्तरोत्तर पसरत जाऊन ती दाक्षिण ब्रम्हदेशांत थाटनपर्यंत जाऊन ठेपली. या वसाहतींनीं स्वतःचीं राज्यें स्थापन केलीं, इतकेंच नव्हे तर आपला धर्म प्रस्थापित केला. या धर्मांत नागपूजेला विशेष महत्त्व

होतें. इसवी सनाच्या पांचव्या शतकांत बुद्धधर्मीयांचें जोराचें आक्रमण सुरू झालें व कांहीं शतकें हिंदु व बौद्ध यांच्यांत युद्धें चालून हिंदूंचा पुरा वींमोड करण्यांत आला. तथापि देशांत शांतता नांदू लागली नाहीं. कारण बुद्धधर्मांचे दोन उपपंथ– हीनयान व महायान-यांच्यांत भांडणें सुरू झाली व तीं कित्येक वर्षें चाललीं. अखेर पंधराव्या शतकाच्या प्रारंभीं हीनयायांनीं महायानांना पार नेस्तनाबूद करून आपली सत्ता प्रस्थापित केली.

हे सर्व झगडे चालू असतांहि उत्तर ब्रम्हदेशांत पेगन येथें इ. स. ६३८ मध्यें थिंगा राजा राज्य करीत होता. हा मूळचा ब्रम्ही नव्हता. तो कांबोडियन असून कंबोजचा राजा पहिला ईशानवर्मा याचा समकालीन होता. त्यानें पेगनचें राज्य बळकाविलें असें म्हणतात. चिनी इतिहासांत नमूद केल्याप्रमाणें नवव्या शतकांत पेगन हें मोठें सुधारलेलें शहर समजलें जात असे. इ. स. १०१० मध्यें अनव्रात ऊर्फ अनरुद्ध हा शूर ब्रम्ही राजा पेगनच्या गादीवर आला. तो जसा शूर होता तसा धर्मसुधारकही होता. त्यानें १०१० ते १०५२ पर्यंत ४२ वर्षें उत्कृष्टप्रकारें राज्य केलें, गादीवर येतांच त्यानें शान काबीज केलें, आराकानला शरण यावयास लावलें आणि तेलंग्यांची राजधानी थाटन ताब्यांत घेतली. अशा प्रकारें उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतचा सर्व प्रदेश एका सत्तेच्या अमला-खालीं आला. अनव्रात व त्याच्यानंतर गादीवर आलेले ब्रम्ही राजे हे विशिष्ट शिल्पकलेचे मोठे आश्रयदाते होते. त्यांच्या कारकीर्दींत आज ब्रम्हदेशांत जे प्रचंड पॅगोडा ऊर्फ मंदिरें दृष्टीस पडतात तसल्या प्रकारची वास्तुशिल्पाची कला फार जोरानें फोफावली. आजहि पेगन येथें जुन्या इमारतींचे अवशेष दृष्टीस पडतात व मन

आश्चर्यानें थक्क होऊन जातें. नराब्धिसेतु (११६७-१२०४) या राजानें हीनयान धर्मपंथाचा विशेष प्रसार केला. त्या सालीं त्यानें सिलोनलाही शिष्टमंडळें पाठविलीं काहीं वर्षे ह्या धर्माचा उत्कर्ष होत राहिला; पण १२८६ मध्यें कुब्लाई खान या मध्य आशियाच्या पठारावरील तार्तरानें जेव्हां या राज्यावर स्वारी केली तेव्हां मोंगलांपुढें हतवीर्य होऊन ब्रम्ही राजा शरण आला. पण कुब्लाई खानाचा दणका एवढा जोरदार होता कीं अनव्रतानें स्थापलेलें साम्राज्य त्या धक्क्यानें इ. स. १२९८ मध्यें जमीनदोस्त झालें.

इ. स. १५३० मध्यें ताबिनश्वेदी हा कर्तृत्ववान् राजा उदयास येईपर्यंत ब्रम्हदेशांत शान, ब्रम्ही, सयामी, आराकानी व बंगाली यांच्यांत परस्पर हेवेदावे व बंडाळी सुरू होती. आव्हा येथें नवीन राजधानी स्थापन झाली होती, त्यामुळें शान घराण्याला अधिक स्थैर्य आलें होतें. पण सोळाव्या शतकांत हें राजघराणें लयास गेलें. ताबिनश्वेदीनें १५४० च्या सुमारास पेरू व मर्तबान घेतलें, त्याच्या-वर हिंदी मुसलमान व पोर्तुगीज यांनीं स्वाऱ्या केल्या असतां त्यानें निधड्या छातीनें त्या परतवल्या. दोन वर्षांनीं त्यानें प्रोम घेतलें, त्या वेळीं त्यानें आपल्या तोफखान्यावर पोर्तुगीजांची नेमणूक केली होती. पण १५४८ मध्यें या राजाचा खून झाला व त्याच्या सेनापतीनें राज्यपद बळकाविलें. हा सेनापति बाईन नाँग ब्रम्हदेशाच्या इति-हासांत एक लोकविलक्षण व्यक्ति म्हणून प्रसिद्ध आहे. तो मोठा योद्धा तर होताच पण धर्म, राज्यव्यवस्था, व्यापार, शिल्पकला वगैरे बाबतींत त्यानें कित्येक सुधारणा केल्या. त्यानें ब्रम्हदेशांत पहिल्याप्रथम आरमार उभारलें आणि १५७६ मध्यें कोलंबोहून गौतमबुद्धाचा दांत आणवून त्यावर प्रचंड देऊळ बांधलें.

नाँगच्या मृत्यूनंतर देशांत इतकी बंडाळी माजली कीं तीन वर्षांच्या आंतच हरकाम्या म्हणून आलेल्या फिलिप डी ब्रिटो या पोर्तुगीज तरुणानें मोठें साहस करून पेगूचें सिंहासन बळकावलें. आणि लागलींच गोव्याच्या पोर्तुगीज व्हाईसरॉयची मुलगी त्याला सांगून आली. फिलिप धाडसी असला तरी अरेराव व उन्मत्त होता. त्यामुळें नाँगचा नातू महाधम्मराज यानें त्याच्यावर स्वारी करून त्याचें राज्य हिसकावून घेतलें आणि त्याला व त्याच्या राणीला काळ्या पाण्यावर पाठवून दिलें. गोव्याहून मदत आली, पण ती फार उशीरां आल्यामुळें तिचा उपयोग झाला नाहीं.

महाधम्मराजानें १६२८ पर्यंत राज्य केलें व आपलें साम्राज्य चहूं-बाजूंनीं वाढविलें. त्यानें आपल्या कारकीर्दींत सर्वांत महत्त्वाची व लोक-कल्याणाची कोणती गोष्ट केली असेल तर ब्रम्हदेशाच्या किनाऱ्या-भोंवतीं चांचेगिरी करणाऱ्या पोर्तुगीज खलाशांचा त्यानें बींमोड केला ही होय. चांचेगिरी करणाऱ्या पोर्तुगीजांचा जनतेला अतिशय उपद्रव होत होता. विशेषत: बंगालच्या उपसागरांत त्यांनीं अगदीं धुमाकूळ मांडला होता. सेबॉस्टियन गोंझालेस या नांवाचा एक आडदांड गुंड होता, त्यानें १६१२ मध्यें चितागाँगवर स्वारी केली व तो तेथला राजा झाला. महाधम्मराजाचें राजघराणें १७४० पर्यंत कसें तरी जीव धरून होतें, पण पुढें स्वदेशी शत्रूपेक्षां परदेशी आक्रमक जसजसे ब्रम्हदेशावर चालून येऊं लागले तसतशीं ब्रम्ही राज्यें नाहींशीं होत गेलीं.

१७५२ मध्यें अलुंगकाया या नांवाचा एक मोठा योद्धा उदयास आला व त्यानें श्वेबू येथें आपलें राज्य स्थापन केलें. आव्हा व प्रोम हीं शहरें त्यानें जिंकून घेतल्यावर रंगून येथें आज जो प्रचंड श्वेडॅगन

पॅगोडा दिसून येतो तो त्यानें बांधला. त्याच्या अंमदानींतच त्याचा फ्रेंच व इंग्रज यांच्याशीं संबंध आला. त्याच्या राजघराण्यांतील राजांनींही बरींच वर्षें राज्य केलें व ठिकठिकाणीं प्रचंड धर्ममंदिरें उभारलीं. हेंच राजघराणें गादीवर असतां १८२४ मध्यें इंग्रजांशीं त्याचा झगडा झाला व त्या वर्षी पहिलें ब्रम्हीं युद्ध घडून आलें. या युद्धांत ब्रम्ही राजानें आराकान व तेनासरीम हे प्रांत गमावले. पुढें ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या वाढत्या प्राबल्यामुळें १८५२ सालीं दुसरें ब्रम्हदेशचें युद्ध झालें. त्यांत पेगू प्रांत ब्रिटिश साम्राज्याला जोडला गेला. पुढें शेवटचा राजा थिबा याच्या कारकीर्दींत तिसरें ब्रम्हदेशचें युद्ध होऊन १८८६ मध्यें संपूर्ण ब्रम्हदेश ब्रिटिश साम्राज्यांत विलीन झाला.

१९३१ सालीं ब्रम्हदेशाची लोकसंख्या १ कोटी ४६ लाख (१,४६,४७,७५६) होती तर १९४१ च्या खानेसुमारीच्या वेळीं तिच्यांत १५ टक्क्यांनीं वाढ दिसून आली. म्हणजे या वेळीं ब्रम्हदेशाची लोकसंख्या १ कोटी ६८ लाख (१,६८,२३,७९८) झाली. जपानी आक्रमणामुळें १९४१ च्या शिरगणतीचे सर्व आंकडे उपलब्ध नाहींत. १९३१ सालच्या खानेसुमारींत ब्रम्हदेशांतल्या विविध जातींची व परस्थांची संख्या पुढीलप्रमाणें होती :—

| | |
|---|---|
| ब्रम्ही | ९६,२७,१९६ |
| केरेन | १३,६७,६७३ |
| शान | १०,३७,४०८ |
| चिन | ३,४८,९९४ |
| मॉन | ३,३६,७२८ |
| काचिन | ४,००,००० |
| पालाउंग वा | १,७६,३८२ |
| लोलो-मुशो | ९३,२२४ |
| नाग | ७०,००० |

२९००८
१९८०
३१-७-६१



| | |
|---|---|
| हिंदी | १०,१७,८२५ |
| चिनी | १,९३,५९४ |
| इंडो-बर्मन | १,८२,१६६ |
| अँग्लो-इंडियन, अँग्लो-बर्मन | १९,२०० |
| युरोपियन | ११,६५१ |

* * *

ब्रम्हदेशाचें एकंदर क्षेत्रफळ २,६२,००० चौरस मैल आहे. त्यापैकीं शाना संस्थानांचें ५६,००० चौरस मैल भरतें. सबंध देशाची दक्षिणोत्तर लांबी १३०० मैल असून पूर्वपश्चिम रुंदी सुमारें ६०० मैल आहे. ब्रम्हदेशाला सुमारें २००० मैल लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे.

क्षेत्रफळाच्या मानानें तेथील लोकवस्ती अतिशय विरळ आहे. हिंदुस्थानांत हें लोकवस्तीचें प्रमाण दर चौरस मैलाला २४२ आहे, चीनमध्यें तें २३१ आहे, तर ब्रम्हदेशांत फक्त ६५ आहे. टेकड्यांच्या प्रदेशांत तें थोडें जास्त आहे, म्हणजे ११४ च्या आसपास आहे.

* * *

सर्वसामान्यपणें हिंदुस्थानप्रमाणेंच ब्रम्हदेशांतील पावसाचें मान आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरावड्यापासून तों आक्टोबर अखेर ब्रम्हदेशांत पाऊस पडतो. अर्थात् निरनिराळ्या प्रदेशांत तो कमी-जास्त असतो हें सांगावयास नकोच. समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशांत त्याचें प्रमाण दोनशें इंच असतें तर इरावतीच्या खोऱ्यांत शंभर

इंच पाऊस पडतो. टेकड्यांच्या प्रदेशांत हें प्रमाण ऐशीं इंचांवर येतें तर मध्यभागांत २५ ते ४५ अशी सरासरी असते. ब्रम्हदेशाचें हवामान एकंदरीनें उष्णच आहे. डिसेंबर व जानेवारी हे कडक थंडीचे महिने आहेत, पण त्या वेळींहि उष्णतामान साठ अंशांच्या खालीं जात नाहीं.

ब्रम्हदेशांतील महत्त्वाचीं पिकें व शेतजमिनीचें क्षेत्रफळ पुढील-प्रमाणें सांगतां येईल:

| | | |
|---|---|---|
| तांदूळ | १,२०,३६,००० | एकर |
| तीळ व शेंगदाणे | २०,७३,००० | ,, |
| ज्वारी | ५,७६,००० | ,, |
| माज्या | ५,०६,००० | ,, |
| फळबागा | ४,४८,००० | ,, |
| कापूस | ४,०४,००० | ,, |

सबंध देशांतील एकूण मशागती जमीन १,७३,४३,००० एकर असून त्यांपैकीं दक्षिण ब्रम्हदेशांत म्हणजे इरावतीच्या खोऱ्यांत १,००,००,००० एकर आहे.

लागवडीस आणलेल्या एकंदर जमिनींपैकीं सत्तर टक्के जमिनींत नुसता तांदूळ पिकतो. उत्तर ब्रम्हदेश, प्रोम, टोंगू, आराकान, मध्य-देश, तेनासरीम व इरावती खोरें हे तांदुळाचे सर्वांत मोठे प्रदेश आहेत. पण उत्तर ब्रम्हदेशापेक्षां तेनासरीम प्रांतांत व इरावती खोऱ्यांत तांदुळाचें उत्पन्न सर्वांत जास्त होतें. गेल्या पन्नास वर्षांत ब्रम्हदेशांतील तांदुळाचें पीक निदान दीडपटीनें तरी वाढलें आहे. जगांतील इतर देशांच्या मानानें ब्रम्हदेशांतील तांदुळाचें पीक कांहीं प्रचंड नाहीं, पण ब्रम्हदेशांतून सर्वांत जास्त तांदूळ परदेशांत निर्यात

होतो. चीनमध्यें दरवर्षी ५ कोटि टन तांदूळ पिकतो, हिंदुस्थानांत ३ कोटि ८८ लक्ष, जपानमध्यें १ कोटि ३० लक्ष, इंडोनेशियांत ५७ लक्ष ३३ हजार, थायलंड ४९ लक्ष २९ हजार, कोरिया ३२ लक्ष ६५ हजार, फोर्मोसा १४ लक्ष २८ हजार, व. ब्रम्हदेश ७५ लक्ष टन याप्रमाणें तांदुळाच्या पिकाचे आंकडे सांगतां येतील.

* * *

ब्रम्हदेशांत मोठमोठीं जंगलें असल्यामुळें तेथें इमारती लाकडाची पैदास फार मोठ्या प्रमाणांत होते. सबंध देशाच्या क्षेत्रफळापैकीं १,४५,००० चौरस मैल जंगलानें व्यापले आहेत. म्हणजे ब्रम्हदेशांत सुमारें ५७ टक्के जंगल आहे असें म्हटलें तरी चालेल. टीक नांवाच्या चिवट इमारती लाकडाचें वार्षिक उत्पन्न ४,४६,००० टन आहे. त्यापैकीं जवळ जवळ निम्में म्हणजे २,१४,००० टन परदेशांत निर्यात होतें. या निर्यात लाकडाची किंमत ३ कोटि ३० लक्ष रुपये येते. सुमारें दोन लाख लोक या लाकडाच्या धंद्यांत गुंतले असून लाकडाचे ओंडके वहाण्याच्या कामीं सुमारें २२ हजार माणसाळलेल्या हत्तींचा उपयोग केला जातो.

* * *

खनिज द्रव्यें व खनिज तेल या बाबतींत ब्रम्हदेश अतिशय समृद्ध आहे. तेथें असलेल्या तेलाच्या विहिरींतून सबंध जगाला पेट्रोल व रॉकेल पुरविलें जातें. पेट्रोलशिवाय सुमारें सव्वाचार कोटि रुपये किंमतीचीं खनिज द्रव्यें दर वर्षीं निघतात. या खनिज द्रव्यांच्या उत्पादनांत चांदी २४ लक्ष तोळे, शिसें ७७ हजार टन, व कथील

साठ हजार टन यांचा समावेश होतो. इंद्रनील व माणिक हीं रत्नेंही मॅंगोक खाणींत आढळतात. १९३९ सालीं सुमारें दीड लक्ष किंमतीचीं रत्नें सांपडलीं.

*  *  *

इरावती नदीच्या कांठाकांठानें ठिकठिकाणीं तेलाच्या विहिरी आहेत व गेलीं कित्येक शतकें त्यांतून तेल काढण्यांत येत आहे. आज ब्रम्हदेशांत सुमारें ४५०० तेलाच्या विहिरी असून त्यांतून तीस कोटी गॅलन तेल निघूं शकतें. हें तेल ब्रम्हदेशाला पुरून उरतें व सुमारें सहा कोटी गॅलन पेट्रोल व चौदा कोटी गॅलन रॉकेल हिंदुस्थानांत निर्यात होतें.

१९३९-४० सालीं ब्रम्हदेशांतून सुमारें ५४ कोटी ७६ लक्ष रुपयांचा माल परदेशांत रवाना झाला. यापैकीं एकट्या हिंदुस्थानांत ६० टक्के आला. ग्रेट ब्रिटन, जपान व सिलोन या देशांत बाकीचा गेला. या निर्यात मालांत तांदूळ २४ कोटी १० लक्ष, इमारती लाकूड ३ कोटी ५५ लक्ष, रॉकेल व पेट्रोल १४ कोटी ३६ लक्ष व खनिज द्रव्यें आणि अशोधित धातु ६ कोटी २२ लक्ष अशी वर्गवारी करतां येईल.

याच सालांत ब्रम्हदेशांत सुमारें २५ कोटी ३२ लक्ष रुपयांचा माल परदेशांतून आला. म्हणजे निर्यातीपेक्षां आयात २९ कोटी ५३ लक्षांनीं कमी होती असें दिसतें. या आयात मालापैकीं हिंदुस्थानांतून ५५ टक्के आला, बाकीचा ग्रेट ब्रिटन व जपान यांनीं पुरवला. ब्रम्हदेशाजवळ तेल, तांदूळ व लाकूड विपुल असलें तरी आवश्यक गरजा पुरविणारे पदार्थ नाहींत. त्यामुळें कापड, लोखंड, पोलाद, कागद, कोळसा, रासायनिक द्रव्यें, यंत्रसामुग्री इत्यादि-

कांची परदेशांतून आयात करावी लागते. या सर्वांत कापड २४ टक्के असून त्याची किंमत सुमारें ६ कोटी १२ लक्ष रुपये होते.

**इतर किरकोळ माहिती**

रंगून हें सर्वांत मोठें बंदर असून उतारू व माल यांची सर्वांत मोठी व्हातूक या बंदरांतून होते. आयातनिर्यातीपैकीं शें. ८६ टक्के माल येथून येतो व जातो. सुमारें २॥ लक्ष उतारू येतात व तितकेच बाहेर जातात.

रंगून शहराची लोकसंख्या ५ लक्ष असून त्यांत १ लक्ष ६० हजार ब्रम्ही, २ लक्ष ८० हजार हिंदी, ४० हजार चिनी, व बाकीचे इतर आहेत.

ब्रम्हदेशांत एकूण २८५२ मैज लांबीची रेल्वे आहे तर जलमार्ग २६१२ मैल आहे. खेडेगांवांतील व शहरांतील रस्त्यांची एकूण लांबी १८० हजार मैल होईल.

देशांतील साक्षरतेचें प्रमाण १९४० मध्यें पुरुषांत शें. ५६ व स्त्रियांत शें. १६ झालें होतें.

६८०० प्राथमिक शाळा असून त्यांत सुमारें ५ लक्ष २२ हजार विद्यार्थी शिकतात. याशिवाय बौद्ध भिक्षूंनीं चालविलेल्या खाजगी धार्मिक शाळा आहेत त्या निराळ्याच. त्यांची संख्या १८ हजार असून त्यांत दोन लक्ष विद्यार्थी शिकत आहेत. २७० हायस्कुलांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५५ हजार भरेल.

१९२० सालीं रंगून विद्यापीठ अस्तित्वांत येण्यापूर्वीं फक्त दोन कॉलेजें होतीं व तीं कलकत्ता विद्यापीठाला जोडलेलीं होतीं. त्यानंतर आज सहा कॉलेजें निघालीं आहेत. एक मंडालेला आहे.

१९४१ सालीं कॉलेज विद्यार्थ्यांची संख्या २७२८ होती, त्यापैकीं ५४४ विद्यार्थिनी होत्या.

रंगून विद्यापीठाला जोडलेल्या बौद्धिक शिक्षण देणाऱ्या कॉलेजांशिवाय इंजीनियरिंग, मेडिकल, शेतकी, फॉरेस्ट, व्हेटरिनरी इत्यादि व्यावसायिक शिक्षण देणारीं कॉलेजें ठिकठिकाणीं स्थापन झालीं आहेत.


ब्रम्हदेशांत सुमारें २५० ग्रंथालयें असून त्यांत एक लक्ष पुस्तकें आहेत.

१९१४ ते १९३४ या दरम्यान ब्रम्ही भाषेंत २२१४ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. यांपैकीं ७०० धार्मिक ग्रंथ असून कादंबऱ्यांची संख्या चारशेंच्या आंतच आहे.

ब्रह्मदेशांत दर हजारीं जन्माचें प्रमाण ३३ असून मृत्यूचें प्रमाण २५ आहे.


* * *

ब्रम्हदेश हा एकंदरीनें शेतीप्रधान देश आहे. तेथें जरी तांदुळाच्या गिरण्या, तेलाच्या विहिरी, इमारती लाकडाचे कारखाने व खनिज द्रव्यांच्या खाणी असल्या तरी ह्या देशाला उद्योगधंद्यांचा देश असें कोणी म्हणणार नाहीं. त्यामुळें तेथें मोठ्या शहरांऐवजीं सगळीकडे लहान लहान खेडींच वसलेलीं दिसावीं यांत आश्चर्य नाहीं. दहापांच बांबूच्या झोंपड्या व लांबच लांब पसरलेलीं शेतें यांचा समुदाय म्हणजे खेडें अशी तेथें परिस्थिति आहे. रंगून आणि मंडालें हीं दोन मोठीं शहरें सोडल्यास मोल्मीन, बासीव व अक्याब हीं ४० हजार वस्तीचीं फक्त तीन शहरें आहेत. जेथें जेथें औद्योगिक केंद्रें आहेत, बंदरें आहेत, रेल्वे आहेत, किंवा तांदुळाच्या गिरण्या



**श्री॰ थाकिन नू**

ब्रह्मदेशाचे आजचे मुख्य प्रधान॰





**ब्रह्मदेशाचे माजी मंत्रि**

यु बा चो — माहन बा खैंग

जनरल आँगसान यांच्याबरोबर या दोघांचे खून झाले.





ब्रह्मदेशाचे माजी मंत्री

माडंग पॉन मावा

रझाद

हे दोघे व थाकिन म्या यु सॉ यांच्या खुनी हल्ल्याला बळी पडले.





थाकिन म्या

ऑगसान मंत्रिमंडळांतील अर्थमंत्रि

यु सॉ

यांना फाशीची शिक्षा झाली.

आहेत तेथें तेथें थोडी लोकवस्ती वाढलेली दिसते; पण मोठें खेडें यापेक्षां या गांवांना विशेष निराळें असें स्वरूप नाहीं. अगदीं मोठीं शहरें हिंदुस्थानांतल्या मोठ्या शहरांप्रमाणें सुधारलेलीं व समृद्ध आहेत. रंगून हें शहर सर्वांत मोठें आहे; पण तेथील वस्ती अतिशय गजबजलेली आहे. १९३१ सालीं तेथील लोकसंख्या चार लक्ष होती ती दहा वर्षांनीं पांच लक्षांवर गेली आहे. बंदर म्हणून व विमानतळ या नात्यानें जगाच्या दळणवळणांत रंगूनला फार मोठें महत्त्व प्राप्त झालें आहे. ब्रह्मदेशाच्या आयातनिर्यात मालापैकीं ८५टक्के मालाचा चढउतार एकट्या रंगून बंदरांत होतो. रंगूनच्या विरुद्ध मंडाले शहर आहे. आधुनिक सुखसोयींनीं व सुधारणांनीं नटलेलें रंगून कुठें तर जुन्या धर्तीचीं ओबडधोबड लांकडी घरें, बौद्ध मठ आणि श्मशानशांतता या वैशिष्ट्यांनीं भरलेलें वयोवृद्ध मंडाले कुठें? मंडालेची लोकसंख्या १ लक्ष ६३ हजार आहे, पण त्याला व्यापारी व राजकीय महत्त्व नसल्यामुळें उत्तरोत्तर तें मागें पडत चाललें आहे. १९०८ सालीं कै. लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर त्यांना मंडाले येथें आणून ठेवलें होतें हें पुष्कळांना माहीत असेलच. या मंडालेच्या तुरुंगांतच त्यांनीं 'गीताहरस्य' हा आपला चिरस्मरणीय ग्रंथ लिहिला.

---

इ. स. १८२४ चें पहिलें ब्रम्ही युद्ध झाल्यावर आकारान व तेनासरीम हे प्रांत ईस्ट इंडिया कंपनीकडे आले. प्रारंभीं बंगाल इलाख्यांत हे प्रांत समाविष्ट करण्यांत आले होते व त्यांच्या राज्यव्यवस्थेसाठीं कलकत्याच्या गव्हर्नर जनरलच्या हाताखालीं आराकान व तेनासरीम येथें स्वतंत्र कमिशनर नेमण्यांत आले होते. पुढें दुसऱ्या ब्रम्ही युद्धानंतर जेव्हां कंपनीला पेगू हा प्रांत मिळाला तेव्हां १८६२ मध्यें तिन्ही प्रांतांचें एकीकरण करून त्याला ब्रिटिश बर्मा असें नांव देण्यांत आलें. हे तीन प्रांत ब्रह्मदेशाच्या पश्चिम पट्टीवर समुद्रकिनाऱ्यानजीकचे असल्यामुळें त्यांचा एक सलग प्रांत बनविणें सोपें झालें. या प्रांतावर चीफ़ कमिशनरची नेमणूक करण्यांत आली व त्याचें मुख्य ठाणें रंगून हें ठरविण्यांत आलें.

ब्रिटिश ब्रम्हदेशाची आर्थिक व व्यापारी दृष्ट्या हळूहळू भरभराट होऊं लागली. कारण १८६९ मध्यें सुएज कालवा झाल्यामुळें युरोपचा मार्ग खुला झाला. ब्रम्हदेशांत पूर्वीपासूनच भरपूर तांदूळ पिकत होता. पण परदेशांतील निर्गत व्यापाराचें द्वार खुलें झाल्यापासून टीक लाकडाबरोबर तांदूळही परदेशांत जाऊं लागला. त्या वेळीं युरोप

हें ब्रम्हदेशाच्या तांदुळाचें एकुलतें एक गिऱ्हाईक होतें. त्यामुळें तांदुळाची मागणी एकसारखी वाढूं लागली. त्याचा परिणाम असा झाला कीं तांदुळाची अधिकाधिक लागवड करण्याची प्रवृत्ति शेतकऱ्यांत उत्पन्न झाली. त्या सालीं हिंदुस्थानांतून शेकडों शेतमजूर आणविण्यांत आले व सरकारतर्फे हिंदी मजुरांच्या आयातीला उत्तेजन देण्यांत आलें. या सर्व प्रयत्नांचा इतका जोरदार परिणाम झाला कीं १८५५ मध्यें ज्या पेगू प्रांतांत तांदुळाच्या लागवडीचें क्षेत्र ५ लक्ष ६३ हजार एकर होतें तें १८८० मध्यें १५ लक्षांवर गेलें.

ब्रह्मदेशांत समुद्र व मोठमोठया नद्या असल्यामुळें बरेचसे जलमार्ग होते पण त्या मानानें स्थलमार्ग फार कमी होते. १८५० मध्यें रंगून ते प्रोम ही पहिली मोठी सडक तयार करण्यांत आली. रेल्वे मात्र त्या मानानें फार उशीरां तेथें सुरू झाली. इरावती व्हॅली स्टेट रेल्वे कंपनीनें १८७७ सालीं रंगून ते प्रोम ही पहिली आगगाडी सुरू केली, त्यानंतर १८८४ मध्यें रंगून ते टोंगू हा दुसरा फांटा तयार झाला.

या काळांत ब्रिटिश ब्रह्मदेशाची राज्यपद्धति जुन्या वळणाच्या नोकरशाहीच्या पद्धतीची होती.

चीफ कमिशनर हा मुख्य अधिकारी आपल्या खालच्या अधिकाऱ्यांच्या साहाय्यानें देशाचा राज्यकारभार हाकीत असे. न्यायदानही तोच करी. कायदेकानू करण्याचें काम कलकत्त्याच्या हिंदी कायदेमंडळाकडे होतें. या कायदेमंडळांतले सर्व सभासद युरोपियन असत आणि ते सरकारनियुक्तही असत. १८७४ मध्यें ब्रह्मदेशांत पहिली म्युनिसिपल कमिटी स्थापन झाली.

१८८५ सालीं तिसऱ्या ब्रह्मी युद्धानंतर मंडालेचा राजा थिबा

याला पदच्युत करण्यांत आलें व मंडालेसहित ब्रह्मदेशाचा उरलेला भाग ब्रिटिश ब्रह्मदेशास जोडण्यांत आला. थिबाला हद्दपार केल्यावर त्याच्या गादीला कोणीही वारस नसल्यामुळें त्याचें राज्य ब्रिटिश साम्राज्यांत समाविष्ट करण्यांत आलें. ता. १ जानेवारी १८८६ पासून ब्रह्मदेश हा हिंदी साम्राज्याचा घटक बनला. या दिवशीं स्वतंत्र ब्रम्हदेशाचें अस्तित्व नष्ट होऊन तो ब्रिटिश साम्राज्यांत खालसा करण्यांत आला.

ब्रिटिशांनीं हिंदुस्थान घेतल्यावर प्रारंभींच्या काळांत तेथें जशी राज्यव्यवस्था सुरू करण्यांत आली होती त्याच धर्तीचा राज्य-कारभार ब्रम्हदेशांत सुरू झाला. आणि हिंदुस्थानच्याप्रमाणेंच येथेंही असंतोषाचीं वादळें अधून मधून वाहूं लागलीं. सशस्त्र शिपायांनीं एकदां बंड केलें तर शान संस्थानांतल्या संस्थानिकांनीं एकजूट करून ब्रिटिशांपासून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला. त्यामुळें १८९० सालीं हीं उरलींसुरलीं संस्थानेंही ब्रिटिश अंमलाखालीं आलीं. या संस्थानांमुळें फ्रेंच व चिनी संबंधांत एक नवीनच अडचण उत्पन्न झाली. कांहीं मुलूख फ्रेंचांचा होता व ते त्यावर हक्क सांगत होते. अखेर १८९४ व १९०४ या दोन सालीं फ्रेंच व इंग्रज यांचे अनाक्रमणाचे तह होऊन ही कटकट कायमची मिटली. ब्रम्ही मुलुखाबद्दल ब्रिटिशांनीं चीनला खंडणी देण्याचें कबूल केलें. सयाम ऊर्फ थायलंड व चीन या देशांशींही ब्रिटिशांना सलोख्याचे संबंध जोडावे लागले, कारण ब्रम्हदेशाला ह्या दोन्ही देशांच्या सरहद्दी दोन्ही बाजूंनीं भिडल्या आहेत. ब्रम्हदेशांतून चीनमध्यें जाणारा राजमार्ग तयार करावा अशी बरीच वर्षांपासून ब्रिटिशांची मनीषा होती ती १९३९ मध्यें पुरी झाली. बर्मा रोड

अ. भ्री. सं. हाते, ग्रन्थालय शाखा.
२७८९
वि. ९१ : ९१



या नांवानें प्रसिद्ध असणारा प्रचंड राजरस्ता लॅशिओ ते चुंकिंग असा बांधण्यांत आला व त्यावर लाखों रुपये खर्च झाले. दुसऱ्या महायुद्धांत या रस्त्याला केवढें महत्त्व आलें व त्याच्या द्वारें दारू-गोळ्याची व यंत्रसामुग्राची किती ने-आण करण्यांत आली हें सांगण्याची जरूरी नाहीं.

ब्रम्हदेशाच्या निर्गत व्यापाराची, तांदुळाच्या उत्पादनाची व उद्योगधंद्यांची जितकी झपाट्यानें प्रगति झाली तितकी ब्रम्हदेशाची राजकीय प्रगति अगदीं संथपणें झाली. व्यापारी क्षेत्र बहुतेक ब्रिटिश व्यापारी कंपन्यांनीं काबीज केलें होतें व निर्गत व्यापारावर त्या भरमसाट फायदा मिळवीत होत्या. ब्रम्हदेशाचें शोषण जर कोणीं केलें असेल तर या युरोपियन व्यापारी कंपन्यांनीं केलें. त्यांनीं तांदुळाची मक्तेदारी आपल्या हातीं घेतली, रॉकेल व पेट्रोल या तेलांच्या खाणी आपल्या ताब्यांत घेतल्या व टीक आणि इतर इमारती लाकूड यांच्या जंगलांवर आपला हक्क शाबीत केला. अशा प्रकारें ब्रम्हदेशांत जें नैसर्गिक उत्पन्न होत होतें तें ब्रिटिशांनीं गिळंकृत करण्यास प्रारंभ केल्यामुळें ब्रम्हदेश कंगाल होऊं लागल्यास आश्चर्य काय ?

हिंदुस्थानाबरोबर ब्रम्हदेशाचें भवितव्य निगडित केल्यामुळें हिंदुस्थानाला जसजसे राजकीय हक्क मिळत गेले तसतसे जरी नाहीं तरी पुष्कळ कमी प्रमाणांत व पुष्कळ उशीरां ब्रम्हदेशाला ते हक्क मिळूं लागले. १८९७ मध्यें ब्रम्हदेशांत पहिल्या प्रथम कायदे-कौन्सिल स्थापन करण्यांत आलें होतें. पण १९२३ सालीं सुरू झालेल्या नव्या कायदेमंडळाच्या मानानें हें कौन्सिल म्हणजे एक प्रकारचा फार्स होता. या कौन्सिलांत चार सरकारी व पांच बिन-

सरकारी असे नऊ सभासद होते, आणि बिनसरकारी सभासदांची नेमणूक खुद्द लेफ्टनंट गव्हर्नर करीत असे. ह्या कौन्सिलच्या हातीं काडीमात्र सत्ता नव्हती. पुढें १९०९ सालीं ह्या कौन्सिलच्या सभासदांत वाढ झाली व एकूण १७ पैकीं २ लोकनियुक्त सभासद त्यांत बसूं लागले. १९१५ सालीं सभासदांची संख्या ३० वर गेली, पण लोकनियुक्तांच्या संख्येंत भर पडली नाहीं. हिंदुस्थानांत १९१९ च्या कायद्यान्वयें ज्या सुधारणा अंमलांत आल्या त्या ब्रम्हदेशांत पोंचावयास चार वर्षें लागलीं. १९२३ सालीं तेथें द्विदल राज्यपद्धति सुरू झाली व १०३ सभासदांचें कायदेमंडळ बनविण्यांत आलें. त्यांपैकीं ८० लोकनियुक्त होते. पण संरक्षण, रेल्वे, चलन, पोस्ट इत्यादि महत्त्वाचीं खातीं हिंदुस्थानाच्या मध्यवर्ती सरकारकडे होतीं; फक्त कायदा, सुव्यवस्था व फडणीशी हीं खातीं गव्हर्नर व त्याचे दोन सरकारी सल्लागार यांच्या हातीं होतीं. हे दोघे सल्लागार बहुतकरून युरोपियनच असत. पुढें १९३५ सालीं ब्रम्हदेश सरकारचा कायदा पास झाल्यावर ब्रम्हदेश हिंदुस्थानापासून अलग झाला व ब्रिटिश साम्राज्यांतील एक स्वायत्त घटक म्हणून त्याला स्वतंत्र स्थान मिळालें. हिंदुस्थानाशीं गेलीं अनेक वर्षें संलग्न असलेला ब्रम्हदेश हिंदुस्थानापासून फुटून निघावा अशी मागणी कित्येक वर्षें चालू होती. या दोन प्रांतांचें संलग्नीकरण अव्यवहार्य आहे, इतकेंच नव्हे तर वर्ण, वंश, भूगोल, अर्थशास्त्र इत्यादि दृष्ट्या दोन्ही देश पूर्णपणें विभिन्न असतांना त्यांची एकमेकांची गांठ बांधण्यांत यावी, हें खरोखर विपरीत आहे असें लोकमत अनेक वर्षें प्रचलित होतें. अखेर १९३५ च्या कायद्यान्वयें ब्रम्हदेश हिंदुस्थानापासून विभक्त झाला.

हा नवा कायदा अस्तित्वांत आल्यावर हिंदुस्थान सरकारकडे जे अधिकार होते ते ब्रम्हदेशाच्या नव्या सरकारला आपोआप मिळाले व जबाबदार पद्धतीच्या राज्यघटनेचा पाया घालण्यांत आला. पूर्वीचें कौन्सिल रद्द करण्यांत येऊन त्याच्या ऐवजीं वरिष्ठ सभा व खालची लोकसभा अशीं दोन कायदेमंडळें अस्तित्वांत आलीं. लोकसभेच्या सभासदांच्या निवडणुकीचें क्षेत्र अधिक व्यापक करण्यांत आलें. वरिष्ठ सभागृहांतील निम्मे सभासद लोकसभेनें निवडावयाचे असून बाकीचे गव्हर्नरनें नेमावयाचे असें ठरविण्यांत आलें. लोकसभेला जबाबदार असणाऱ्या दहा मंत्र्यांचें एक मंत्रि-मंडळ नेमण्याची योजना या नव्या घटनेंत करण्यांत आली. संरक्षण, अर्थव्यवस्था व अल्पसंख्य या तीन बाबतींत गव्हर्नरच्या हातीं खास राखीव अधिकार देण्यांत आले असून बाकीचीं सर्व खातीं मंत्र्यांकडे सुपूर्द करण्यांत आलीं. १ एप्रिल १९३७ पासून हा १९३५ चा कायदा हिंदुस्थानाप्रमाणें ब्रम्हदेशांतही अस्तित्वांत आला. आणि पुढें दुसऱ्या युद्धानंतर हिंदुस्थान जितक्या त्वरेनें स्वातंत्र्याकडे गेला तितक्याच जलदीनें ब्रम्हदेशालाहि जबाबदारीच्या स्वराज्याचे हक्क मिळाले. हिंदुस्थानांत सप्टेंबर १९४६ मध्यें तात्पुरतें मध्यवर्ती राष्ट्रीय सरकार स्थापन झालें व त्यानंतर दोनच महिन्यांत घटना-परिषद् सुरू झाली. ब्रम्हदेशांतही यु ऑंगसान यांच्या नेतृत्वाखालीं तात्पुरतें मध्यवर्ती राष्ट्रीय सरकार चालू वर्षाच्या प्रारंभीं अस्तित्वांत आलें आणि १९४७ च्या जून महिन्यांत ब्रम्ही घटनापरिषद् भरली. या घटनापरिषदेनें आपल्या देशाच्या घटनेचा जो आराखडा तयार केला आहे त्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें थोडक्यांत सांगतां येईल.

ब्रम्हदेशाच्या संकल्पित घटनेंत अनेक घटकांचें संयुक्त राज्य

असें ब्रम्हदेशाचें वर्णन करण्यांत आलें असून हिंदुस्थानाप्रमाणेंच तेथें (वरिष्ठ) राजसभा व (कनिष्ठ) लोकसभा अशीं दोन कायदे-मंडळें अस्तित्वांत यावयाचीं आहेत. ब्रम्हदेशाच्या संघराज्याचा प्रमुख म्हणून अध्यक्ष राहील व त्याची निवड दोन्ही सभागृहांमार्फत होईल. या दोन सभागृहांपैकीं वरिष्ठ सभागृहांत कोणाही नाग-रिकाला निवडून येण्याचा अधिकार आहे. पण लोकसभेचें सभा-सदत्व फक्त मागासलेल्या, अल्पसंख्य व डोंगराळ जमातीपुरतेंच मर्यादित आहे. ब्रम्हदेशाची ही आगामी घटना ज्वलज्जहाल राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवर उभारली असली तरी बहुजनसमाजाच्या हितसंबंधाबद्दल त्यांत जो जिव्हाळा दाखविला आहे त्यावरून या घटनेला ‘ समाजवादी राज्यघटना ’ असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. या घटनेच्या आद्य प्रवर्तकांत फॅसिस्टविरोधी जनतास्वातंत्र्य-संघाचे पुढारी कै. जनरल ऑंगसॉन, ब्रम्ही घटनापरिषदेचे अध्यक्ष व आजचे पंतप्रधान थकिन नू यांसारखे समाजवादी विचारसरणीचे कट्टे राष्ट्रीय पुढारी असल्यामुळें तिचें स्वरूप समाजवादी व्हावें यांत आश्चर्य नाहीं.

गेल्या नोव्हेंबर महिन्यांत ब्रिटिश मुख्य प्रधान क्लेमंट ॲटली यांनीं पूर्वीं अभिवचन दिल्याप्रमाणें ब्रम्ही स्वातंत्र्याची तारीख जाहीर केली. हिंदुस्थानाला ज्याप्रमाणें ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं तात्पुरतें वसाहतीचें कां होईना पण स्वातंत्र्य मिळालें त्या-प्रमाणें ता. ४ जानेवारी १९४८ रोजीं ब्रम्हदेश ब्रिटिश वर्चस्वा-खालून मुक्त होत आहे. रविवार ता. ४ जानेवारी हा ब्रम्हदेशाच्या स्वातंत्र्यसंपादनाचा सुवर्णदिन आशिया खंडाच्या इतिहासांत संस्मरणीय झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## जपानची स्वारी : : ५

ज्या ब्रह्मदेशांत गेलीं ५० वर्षें शांतता नांदत होती त्या देशाला जपानी आक्रमणामुळें १९४१ सालीं युद्धभूमीचें स्वरूप आलें. ब्रम्ही लोक हे जात्याच शांततावादी व धार्मिक वृत्तीचे, त्यामुळें जपानचें परचक्र त्यांना प्रचंड गंडांतरासारखें वाटल्यास नवल नाहीं. १९४१ च्या डिसेंबर महिन्यांत जपाननें ब्रम्हदेशावर पहिला हल्ला चढविला. आपलें साम्राज्य वाढविणें हें त्याचें उद्दिष्ट होतें, त्याचप्रमाणें ब्रम्हदेशांतून चीनमध्यें जाणारा मोठा राजमार्ग काबीज करणें हाही जपानचा हेतु होता. चीन-जपानच्या युद्धांत चीनला संरक्षण देण्याच्या दृष्टीनें हा बर्मा रोड फार महत्त्वाचा व उपयुक्त असल्यामुळें तो आपल्या ताब्यांत घेण्याची जपाननें धडपड करावी हें स्वाभाविकच होतें.

हा बर्मा रोड ऊर्फ ब्रम्हदेश व चीन यांना जोडणारा राजमार्ग ११५० मैलांचा असून तो ब्रम्हदेशांतील लॅशिओ या रेल्वे स्टेशनपासून चुंकिंगपर्यंत जातो. चुंकिंग ही चीनची युद्धकालीन राजधानी होय.

हा रस्ता १९३८ मध्यें बांधावयास सुरवात झाली व १९३९ च्या जानेवारींत तो वाहतुकीस खुला झाला.

युरोपांतलें दुसरें महायुद्ध सुरू होण्याच्या सुमारास सप्टेंबर १९३९ मध्यें ब्रम्हदेशाची एकूण फौज सुमारें ५ हजार होती. यापैकीं बहुतेक सैनिक केरेन प्रांतांतले व जंगली मुलुखांतले होते. १९४१ च्या नोव्हेंबर महिन्यांत फौजेची तिप्पट वाढ करण्यांत आली व ब्रम्ही जवानांची फौजेंत भरती झाली. १९४१ अखेर एकूण ब्रम्ही सैन्य १३,५०० झालें.

१९४० च्या जूनमध्यें ब्रम्हीं आरमार दलाची उभारणी झाली तर सप्टेंबरमध्यें पहिलें विमानदल स्थापन करण्यांत आलें. १९४२ च्या प्रारंभीं ब्रम्ही आरमारांत ८ मोठीं जहाजें व ११३० आरमारी सैनिक होते. विमानदलांत १४ लष्करी विमानें व वैमानिक आणि अधिकारी मिळून १०३ होते.

### ब्रम्हदेशांतील जपानी मोहीम

| | | |
|---|---|---|
| ७ डिसेंबर १९४१ | — | जपानची ब्रम्हदेशावर स्वारी. |
| १४ ,, ,, | — | जपानी सैन्यानें व्हिक्टोरिया पॉइंट काबीज केला. |
| २३ ,, ,, | — | रंगूनवर पहिला प्रचंड विमानहल्ला; २००० ठार व तितकेच जखमी. |
| २५ ,, ,, | — | रंगूनवर पुन्हां भयंकर बॉंबवर्षाव. |
| २ जानेवारी १९४२ | — | जनरल वेव्हेलच्या नेतृत्वाखालीं चिनी सैन्य ब्रम्हदेशांत दाखल झालें. |
| ३१ ,, ,, | — | मोलमीनहून ब्रिटिश सैन्याची पिछेहाट. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | फेब्रु. | १९४२ | – जपानी सैन्यानें सालवीन नदी ओलांडली. |
| १५ | ,, | ,, | – सिंगापूरची शरणागति. |
| २० | ,, | ,, | – रंगूनचे नागरिक बाहेर पडले. |
| | | | – सितांग नदीपलीकडून ब्रम्ही सैन्याची पिछेहाट. |
| ३ | मार्च | ,, | – जनरल चिआंग कै शेक व वेव्हेल यांची ब्रम्हदेशास भेट. |
| ७ | ,, | ,, | – रंगून शहरांतून लष्कराचें निर्गमन. |
| २३ | ,, | ,, | – जपान्यांनीं अंदमान बेटें काबीज केलीं. |
| ३ | एप्रिल | ,, | – जपानी सेनेचा मंडालेवर हल्ला. सबंध शहर बेचिराख केलें. |
| २९ | ,, | ,, | – जपान्यांनीं लॅशिओ घेतलें. |
| ३० | ,, | ,, | – मंडालेमधून ब्रिटिश सैन्य पळालें. |
| १५ | मे | ,, | – ब्रम्हदेशांतून पळालेल्या सैनिकांची पहिली तुकडी हिंदुस्थानच्या सरहद्दीवर दाखल झाली. |

जपानी स्वारीमुळें सुमारें ५ लक्ष लोक निर्वासित म्हणून हिंदुस्थानांत येऊन दाखल झाले. जवळ जवळ २० हजार स्त्रीपुरुष व मुलें या शेकडों मैलांच्या खडतर प्रवासांत मृत्युमुखीं पडलीं.

ब्रम्हदेश १९४२ च्या मध्यांतच जपानी अंमलाखालीं आला व १९४४ च्या मार्चपर्यंत तो जपान्यांच्या हातीं होता. त्यानंतर अमेरिका व चीन यांच्या साहाय्यानें जपानची चोहोंबाजूंनीं जी ससे-

होलपट करण्यांत आली त्यामुळें जपानला ब्रम्हदेशांतून काढता पाय घ्यावा लागला. ब्रम्हदेशाच्या मुक्ततेची मोहीम १७ मार्च १९४४ रोजीं सुरू होऊन ४ मे १९४५ रोजीं संपली. या दिवशीं जपानचें ग्रहण सुटलें, पण ब्रिटिशांच्या तावडींतून ब्रम्हदेशाची सुटका झाली नाहीं. तो तसाच ब्रिटिश गुलामगिरींत पिचत राहिला. तथापि १९४७ च्या ऑगस्ट महिन्यांत हिंदुस्थान जेव्हां स्वतंत्र झाला तेव्हां ब्रम्हदेशाच्याहि स्वातंत्र्याची तारीख जाहीर झाली. जपान्यांच्या तडाक्यांतून सुटलेला ब्रम्हदेश जर परत ब्रिटिशांच्या पंजाखालीं राहिला तर त्या सुटकेला अर्थ काय? आतां हा प्रश्नच उरलेला नाहीं. तेव्हां जपानी अंमलाखालून ब्रम्हदेश कसा मुक्त झाला तें पहाणें मनोरंजक ठरेल :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | मार्च | १९४४ | – | उत्तर ब्रम्हदेशांतील जपानच्या लष्करी तळाच्या पिछाडीस विमानांतून सैन्य उतरतें. |
| २२ | ,, | ,, | – | जपानी सैन्य मणिपुरांत शिरतें. |
| ७ | जून | ,, | – | कोहिमांतून जपानची माघार. |
| २८ | ,, | ,, | – | ब्रिटिश सैन्य मोगांग घेतें. |
| २० | जुलै | ,, | – | इंफळमधून जपान्यांची पिछेहाट. |
| ३ | ऑगस्ट | ,, | – | दोस्तांच्या सैन्याचा मिटकिनावर ताबा. |
| १९ | ऑक्टोबर | ,, | – | हिंदी सैन्य टिड्डिम घेतें. |
| १६ | नोव्हेंबर | ,, | – | पूर्व आफ्रिकन फौजेचा कालेम्यांत प्रवेश. |
| ३ | डिसेंबर | ,, | – | कालेवा पडलें. |
| ५ | जानेवारी | १९४५ | – | ब्रिटिश व हिंदी सैनिक अक्याब घेतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | जानेवारी १९४५ | — | श्वेबोचा पाडाव. |
| ४ | फेब्रु. ,, | — | मिटकिनामार्गें कुर्मिंगला पहिली रसद पोचते. |
| ५ | ,, ,, | — | मिकटिला दोस्तांच्या हातीं येतें. |
| २० | मार्च ,, | — | ब्रिटिश व हिंदी सैनिक मंडाले काबीज करतात. |
| ४ | मे ,, | — | दोस्तांचा रंगूनमध्यें प्रवेश व ब्रम्ह-देशाची मुक्तता. |

* * *

ब्रम्हदेश गिळंकृत करण्याचीं जपानचीं कारस्थानें दुसऱ्या महायुद्धापूर्वी बरींच वर्षें चालू होतीं. जपानचे एजंट ब्रम्हदेशांत तळ देऊन बसले होते व ब्रिटिश राजवटीपेक्षां जपानी राजवट कितीतरी श्रेष्ठ आहे, इतकेंच नव्हे तर ब्रम्हदेशाला स्वातंत्र्य देण्याचें जपाननें ठरविलें आहे, असा प्रचार त्यांनीं चालविला होता. जपानच्या ह्या साळसूद आश्वासनावर प्रारंभीं पुष्कळांचा विश्वास बसला. कारण ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीमुळें जनतेंत ब्रिटिशांबद्दल एक प्रकारचा असंतोषमूलक तिरस्कार उत्पन्न झाला होता. १९३८ सालीं ब्रम्हदेशांतील सार्वजनिक निदर्शनांवर जेव्हां ब्रिटिशांनीं निर्दय लाठीहल्ले केले, मिरवणुका उधळून लाविल्या, इतकेंच नव्हे तर पुढाऱ्यांवर बेगुमानपणें गोळीबार केला, तेव्हांपासून ब्रम्ही जनता ब्रिटिशांची द्वेष्टी बनली. राष्ट्रीय वृत्तीचे ज्वलज्जहाल पुढारीसुद्धां ब्रिटिशांचे कट्टे शत्रू व जपानचे पुरस्कर्ते बनले. कम्युनिस्टांनीं मात्र त्या वेळीं धोक्याचा इषारा दिला होता, पण त्याकडे कोणींहि लक्ष दिलें नाहीं; उलट राष्ट्रीय ब्रम्ही पुढारी व जपानचे हस्तक यांचे अधिकाधिक

निकटचे संबंध येऊं लागले. जपान्यांनीं त्यांच्यापुढें जीं अनेक आमिषें ठेविलीं होतीं त्यांत स्वातंत्र्याचें आमिष सर्वांत मोठें होतें. त्यामुळें जपानी आश्वासनें कितपत विश्वसार्ह आहेत याबद्दल त्यांच्या मनांत संशयही उत्पन्न झाला नाहीं. जपान विश्वासघात करील, दगलबाजी करील, त्याच्या स्वातंत्र्यदानाच्या भुलथापांवर विश्वास ठेवूं नका, असें कम्युनिस्टांनीं परोपरीनें सांगितलें असतांहि ब्रम्ही पुढारी जपानशीं करारमदार करावयास सिद्ध झाले. इतक्यांत १९३९ सालीं दुसरें महायुद्ध सुरू झालें. त्यामुळें या वाटाघाटींना अधिकच जोर आला. ब्रम्हदेशांतून ब्रिटिशांना हांकलून देण्यासाठीं जपाननें सर्वतोपरी मदत करावी; व ही मदत ब्रम्हदेशांतल्या सर्व पक्षांचे प्रतिनिधि असलेल्या राष्ट्रीय क्रांतिकारक पक्षातर्फे करण्यांत यावी, या संघटनेनें ब्रह्मी स्वातंत्र्यसेना उभारावी, तिला जपाननें शस्त्रास्त्रें पुरवून सुसज्ज करावी व जपानी सेनापतीच्या हाताखालीं तिनें शत्रूला तोंड द्यावें, आणि याच्या मोबदल्यांत जपानचें बादशाही सैन्य प्रसंग पडतांच ब्रह्मदेशाचें संरक्षण करावयास पुढें येईल व मिकॅडोचें सरकार ब्रम्हदेशाचें स्वातंत्र्य बिनतक्रार मान्य करील, अशा अटी ठरल्या. तसेंच राष्ट्रीय क्रांतिकारक पक्षाच्या प्रमुखांचें तात्पुरतें सरकार स्थापन करण्यांत येईल असेंहि ठरविण्यांत आलें. जपानच्या या औदार्याचा मोबदला म्हणून ब्रम्हदेशानें आपला सर्व व्यापार व चीनमध्यें जाणारा बर्मा-युनान रस्ता जपानच्या हातीं द्यावयाचा, असा करार झाला.

जपानच्या या करारनाम्याला प्रथम जर कोणी बळी पडलें असेल तर डॉ. बा मा हे होत. त्यांना कोणतींच मतें नव्हतीं. बा मा व यु सॉ अशा संधिसाधु माणसांचा ब्रम्हदेशांत तोटा नव्हता. त्या-

मुळें जपाननें पुरस्कारिलेल्या राष्ट्रीय क्रांतिकारक पक्षाची हां हां म्हणतां उभारणी झाली. जपानी योजनेप्रमाणें या पक्षाला २० कोटी रुपये द्यावयाचे ठरलें, तथापि ही रक्कम ब्रम्हदेशाच्या पुनर्घटनेसाठीं राखून ठेवण्यांत ठेवण्यांत येईल असें एक कलम घालण्यांत आलें.


ब्रह्मी-जपानी वाटाघाटी पुऱ्या झाल्यावर क्रांतिकारक पक्षांतील ३२ नवजवानांची निवड करण्यांत आली व त्यांना गुप्तपणें जपानांत नेण्यांत आलें. फोर्मोसा बेटांत त्यांना जरूर तें उच्च प्रकारचें लष्करी शिक्षण देण्यांत आलें. ब्रम्ही स्वातंत्र्यसेनेचें आधिपत्य करण्याइतकी त्यांची तयारी करण्यांत आली.

ब्रम्हदेशावर जपानची स्वारी होण्यापूर्वींचीं दोन वर्षें या क्रांतिकारक पक्षानें ब्रिटिशविरोधी वातावरण उत्पन्न करण्यांत घालविलीं. गुप्त पत्रकें व गुप्त बैठका यांच्या द्वारें ब्रिटिशांविरुद्ध जितका प्रचार करतां येईल तितका करण्यांत आला. ‘ आपण सर्व आशियावासी बांधव आहों ’, ‘ आपण एकाच बुद्ध धर्माचे अनुयायी आहों ’, ‘ परस्परोत्कर्ष हें आपलें ध्येय आहे ’ अशी जपानी मुत्सद्द्यांचीं घोषवाक्यें जेव्हां बहुजनसमाजाच्या कानांवर एकसारखी येऊं लागलीं तेव्हां जपान हाच आपला खराखुरा हितकर्ता बांधव आहे असा जनतेचा समज होऊं लागल्यास आश्चर्य नाहीं. जपानी आश्वासनांमुळें सामान्य जनता व पुढारी इतके भारले गेले होते कीं बुद्धधर्माचें व आशियावासी राष्ट्रांच्या एकीकरणाचें स्तोम माजविणारा जपान चीनसारख्या आपल्या बांधवावर अमानुष हल्ले चढविण्यास मागेंपुढें पहात नाहीं, हें त्यांच्या मुळींच लक्षांत आलें नाहीं. जपानी आश्वासनांवर या वेळीं ज्यांनीं विश्वास ठेवला त्यांत जनरल ऑंगसॉन सारखे फॅसिस्टविरोधी पुढारीही होते, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे—

ती वेळच अशी होती कीं ब्रिटिशांच्या मगरमिठींतून सुटका करून घ्यावयाची असेल तर जपानचें साहाय्य घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी प्रत्येकाची दृढ समजूत झाली होती. ब्रिटन हा जपानचा प्रतिस्पर्धी असल्यामुळें जपानशीं संगनमत करणारे ब्रिटिशांना शत्रू वाटत यांत नवल नाहीं. पण कोणत्याही पक्षांत न रहातां ब्रम्ही स्वातंत्र्यासाठीं झटणारे व कम्युनिस्ट यांच्याबद्दल ब्रिटिशांच्या मनांत शत्रुत्वाची भावना उत्पन्न झाली होती. यामुळें ब्रिटिशविरोधी प्रचार अधिक तीव्र झाला आणि सर्वसामान्य जनतेलाही राष्ट्रीय क्रांतिकारक पक्षाचें म्हणणें अधिकाधिक ग्राह्य वाटूं लागलें व राष्ट्रीय सैन्यांत उघडपणें शेंकडों तरुण भरती होऊं लागले.


जपाननें आपल्याला अनुकूल व ब्रिटिशांना विरोधी असें वातावरण निर्माण करण्यांत यश मिळविलें, पण जपाननें आपलीं वचनें पाळलीं काय ?

अट्टल फॅसिस्ट परंपरेला शोभेल अशा पद्धतीनें जपाननें आपलें एकही आश्वासन पाळलें नाहीं. शिकून तयार झालेल्या तरुण ब्रम्ही सैनिकांसाठीं जपानांतून शस्त्रास्त्रें आलीं नाहींत. पुढाऱ्यांनीं पुष्कळ आदळआपट केल्यावर अखेर टोकियोहून हुकूम आला कीं ब्रम्ही सैन्याला टोंकदार बांबू व भाले देण्यांत यावेत व या साधनांनिशीं त्यांनीं ब्रिटिशांचा कांटा काढावा. टोकियोचा हा हुकूम म्हणजे ब्रम्ही पुढाऱ्यांचा क्रूर उपहास होता. जपानजवळ शस्त्रास्त्रेंच नसतील तर तो कोठून पुरवणार, असें कांहीं पढतमूर्ख पुढाऱ्याच्या मनांत आलें व बाकीच्यांनीं आपल्या मनांत पक्की खूणगांठ बांधली कीं जपानच्या आश्वासनावर विश्वास ठेवण्यासारखा दुसरा मूर्खपणा



पेगन येथील प्राचीन देवालयें.
( ब्रह्मदेशाचें नष्टस्मृति साम्राज्य )

अनुक्रम
विभाग आ:वा
९१८०
३।७।६



थिबा राजाच्या दरबारांत इंग्रज वकील.



ब्रह्मदेशाचा राजा मिंडॉन मिन ( इ. स. १८५३ )

नाहीं. ब्रम्ही क्रांतिकारकांच्या हातीं शस्त्रें दिल्यावर ते आपल्यावरच उलटणार नाहींत कशावरून अशी जपानला खास भीति वाटत असली पाहिजे. आणि दुसरें म्हणजे ब्रम्ही पुढाऱ्यांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा केला नाहीं तर ते करतील तरी काय? त्यांच्या हातून कांहींच होणार नाहीं, या भावनेनें जपानी स्वस्थ बसले असतील काय ?

जपान्यांनीं ब्रम्हदेशावर प्रत्यक्ष हल्ला करण्यापूर्वीं तेथें अशी भूमिका तयार करून ठेवली होती कीं प्रत्येक नागरिकानें जपानी सैन्याला जरूर तो अन्नपुरवठा केला पाहिजे. पण पुढें हल्ला चढविल्यावर जपानी सैनिकांनीं ब्रम्हदेशांत इतकीं अनन्वित, क्रूर व पाशवीं कृत्यें केलीं कीं अशा जपान्यांना आपले मित्र मानल्याबद्दल ब्रम्ही पुढाऱ्यांनीं मनांतल्या मनांत स्वतःला लाखोली वाहिली असेल. ब्रम्हदेशांत जपान्यांनीं वाटेल त्यांचीं घरेंदारें लुटलीं, मनसोक्त अन्य-धान्याची लूटमार केली, शेकडों लोकांना गोळ्या घातल्या, तरुण स्त्रियांवर अमानुष अत्याचार केले, घरांदारांच्या होळ्या पेटविल्या; इतकेंच नव्हे तर आपल्या माणुसकीची होळी केली. पण डॉ. बा मा यांसारखे जपानधार्जिणे मुर्दाड पुढारी जपान्यांच्या आश्वासनांवर भिस्त ठेवून होते. १९४२ च्या जून महिन्यांत मेम्यो येथें भरलेल्या ब्रम्ही पुढाऱ्यांच्या सभेंत टोजोचा असा संदेश वाचून दाखविण्यांत आला कीं, ब्रम्हदेशाचें स्वातंत्र्य ही गोष्ट सध्यांच्या युद्धकाळांत अव्यवहार्य असून विचारांत घेण्यासारखी सुद्धां नाहीं. ब्रम्हदेशाचें भवितव्य जपानशीं निगडित आहे, जपान विजयी होतांच ब्रम्ह-देशाला स्वातंत्र्य मिळेल. टोजोच्या या संदेशामुळेंही स्वार्थी ब्रम्ही पुढाऱ्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला नाहीं व जपाननें नेमलेल्या

ब्रम्हदेशाच्या पुनर्घटना समितींत डॉ. बा मा व त्यांचे चार दोन अनुयायी दाखल झाले. अशा प्रकारें जपानधार्जिण्या पुढाऱ्यांच्या साहाय्यानें ब्रम्हदेशांत तात्पुरतें लष्करी सरकार स्थापन झालें.

ब्रम्हदेशांत जपानची ही जुलमी लष्करी राजवट सुरू झाल्यावर राष्ट्रीय वृत्तीच्या ब्रम्ही पुढाऱ्यांपैकीं पुष्कळांचे डोळे उघडले. जपानी वचनांबद्दलचा त्यांचा भ्रमनिरास झाला. जपान्यांपेक्षां ब्रिटिश किती तरी बरे असें त्यांना वाटूं लागलें. ब्रम्ही जनतेप्रमाणें जपानी लोक बुद्धधर्मीय असूनही जपान जर त्यांना गुलामांपेक्षांही गुलाम मानूं लागला तर जागृत झालेल्या ब्रम्ही जनतेचें मत ब्रिटिशांकडे झुकूं लागल्यास आश्चर्य काय? आणि याच भावनेनें पुष्कळसे ब्रम्ही पुढारी ब्रिटिशांना जाऊन मिळाले व जपानविरुद्ध लढले. इतकेंच नव्हे तर जपानप्रणित ब्रम्ही स्वातंत्र्यसेना जपानी सैनिकांचे अत्याचार पाहून त्यांना प्रतिकार करावयास सज्ज झाली. ही सेना जळजळीत राष्ट्रीयत्वानें भारली गेली असल्यामुळें जपानी अत्याचार तिला सहन करणें शक्य नव्हतें. जपान्यांनीं ब्रम्हदेशांत जें तात्पुरतें सरकार स्थापन केलें होतें तें इतकें जुलमी होतें कीं जनतेला जगावें कसें हेंच कळेना. जपाननें वाटेल तेवढ्या नोटा छापल्या, वर्तमानपत्रांवर भयंकर नियंत्रणें घातलीं, रेल्वेचीं इंजिनें मोडून पडल्यामुळें व नद्यांतील होड्या नाहींशा करण्यांत आल्यामुळें वाहतुकीचीं साधनें नष्ट झालीं, बैल मारल्यामुळें बैलगाड्या दिसेनाशा झाल्या, पेट्रोलच्या अभावीं मोटारी बंद पडल्या, धान्याचे भाव भरमसाट वाढले, ब्रम्हदेशांतील तांदूळ, साखर व कापड जपानांत नेण्यांत आलें आणि अशा प्रकारें जपानी राजवटीचे फायदे जनतेला मिळूं लागले! ब्रिटिश हे अविश्वासार्ह आहेत हें ब्रम्ही जनतेला पूर्वींच

कळून चुकलें होतें पण आपले जातभाई म्हणविणारे हे जपानी अधिक बेभरंवशाचे, विश्वासघातकी व क्रूर आहेत याची ब्रम्हदेशाला प्रचीति आली. ब्रम्ही देशभक्त आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं भुकेलेले होते, पण हें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं त्यांनीं ज्यांचें साहाय्य घेतलें ते क्रूर कसाई निघाले. ब्रम्हदेशाच्या स्वातंत्र्याचेंच त्यांनीं अपहरण केलें. देशभक्तीला व स्वातंत्र्यलालसेलाही कांहीं मर्यादा असावी लागते. सारासारविवेक व दूरदृष्टि नसल्यामुळें ब्रम्ही देशभक्तांची कशी फसगत झाली हें भावी पिढीसाठीं इतिहासांत नमूद करून ठेवलें पाहिजे.

## शान संस्थानें : : ६

ब्रम्हदेशांत ज्या अनेक अल्पसंख्य जमाती आहेत त्यांत दक्षिणेकडे केरेन, पूर्वेकडे शान, उत्तरेकडे डोंगराळ भागांत कार्चीन, नाग व चिन ह्यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. हे शान लोक ब्रम्हदेशाच्या पूर्वेकडील भागांत मंडालेच्या दक्षिणेस शान संस्थानांत रहातात. हीं शान संस्थानें ३४ असून त्यांनीं ५८ हजार चौरस मैलांचा टापू व्यापला आहे. त्यांची लोकसंख्या १५ लक्ष आहे. चुन्याचे खडक व संगमरवराचे दगड यांसाठीं हा प्रदेश प्रसिद्ध आहे. या संस्थानांपैकीं केंटुंग व मॉंगपान हीं दोन संस्थानें १९४३ च्या जुलैमध्यें सयामला देण्यांत आल्यामुळें या प्रदेशाचा विस्तार थोडा कमी झाला आहे. दक्षिणेकडे साल्वीन प्रदेशांत ७० हजार लोकसंख्येचीं तीन केरेनी संस्थानें आहेत. खनिज द्रव्यांच्या दृष्टीनें तीं बरींच समृद्ध असलीं तरी बरींच मागासलेलीं आहेत. तीं ब्रिटिश ब्रम्हदेशांत कधींच सामील झालीं नव्हतीं.

शान संस्थानें हीं परंपरागत चालत आलेल्या राजघराण्याच्या अंमलाखालीं कित्येक शतकें नांदत आहेत. त्या त्या अधिपतींच्या कर्तृत्वानुसार त्यांची सत्ता कमी जास्त अनुभवाला येई. या ३४

संस्थानांपैकीं कांहीं अगदीं लहान म्हणजे २४ चौरस मैल क्षेत्रफळाचीं व २५०० लोकवस्तीचीं आहेत. या संस्थानांचे अधिपति शानच आहेत व त्यांना सावबा म्हणतात. प्रजाही शानच आहे. हे शान व सयामचे श्याम यांचा निकटचा संबंध आहे. ह्या शान लोकांत डोंगराळ प्रदेशांत राहाणाऱ्या कांहीं रानटी जाती आहेत. त्या अजूनही मनुष्याची शिकार हें धार्मिक कृत्य समजतात. पडाउंग स्त्रिया आपल्या गळ्यांत पितळेच्या अनेक सऱ्या करून घालतात. ह्या लोकांचें बहुतेक जीवन बांबूवर अवलंबून असतें. घरें बांधण्यापासून तों लोहाराच्या भात्यापर्यंत ते बांबूचा अनेक प्रकारें आश्चर्यकारक उपयोग करतात.

शान संस्थानांचा एकंदर टापू समुद्रसपाटीपासून ३००० फूट आहे, तथापि तेथें ६० ते १०० इंच इतकाच पाऊस पडतो. या प्रदेशांत तांदूळ बेताचा पिकतो, पण त्याची जागा बटाटा भरून काढतो. तेथें बाटाट्याचें फार मोठें पीक निघतें. टंग नांवाच्या झाडापासून उत्कृष्ट प्रकारचें वार्निश तयार होतें. हीं झाडें अलीकडेच लावलीं आहेत व त्यापासून बरेंच उत्पन्न होतें. या प्रदेशांत खनिज संपत्ति विपुल आहे, याचा शोध चिनी लोकांना कित्येक शतकांपूर्वींच लागला होता. चांदी, शिसें, जस्त यांच्या जशा तेथें खाणी आहेत त्याप्रमाणें माणकांच्याही खाणी आहेत.

---

हिंदुस्थानाप्रमाणें ब्रम्हदेशांत कित्येक वर्षे राजकीय जागृति नव्हती. हिंदुस्थानाशीं निकटचा संबंध येऊनहि ब्रम्हदेशांतील जनतेनें आपल्या हक्कांसाठीं कोणत्याच प्रकारची चळवळ बरींच वर्षें केली नाहीं. हिंदुस्थानांत ज्या सालीं कॉंग्रेस स्थापन झाली त्याच्या दुसऱ्याच वर्षी ब्रम्हदेश पूर्णपणें ब्रिटिश अमलाखालीं आला. त्यामुळें ब्रम्ही जनतेला पारतंत्र्याची जाणीव होण्यास व हिंदी राष्ट्रीय चळवळीचें लोण ब्रम्हदेशापर्यंत पोंचण्यास कांहीं वर्षे लागावीं हें क्रमप्राप्तच होतें. शिवाय ब्रम्ही लोक एकंदरीनें सुस्त, आळशी, तांदुळाच्या समृद्धीमुळें आरामशीर जीवन घालवणारे, त्यामुळें आपल्यावर परके लोक राज्य करीत आहेत किंवा हिंदुस्थानांतून हिंदी लोक येऊन आपला व्यापार काबीज करीत आहेत, अगर चिनी लोक आपल्यावर वर्चस्व गाजवीत आहेत, यांची त्यांना कित्येक वर्षे जाणीवच झाली नाहीं. हिंदी राष्ट्रीय सभेनें पुढें जेव्हां देशभर कॉंग्रेस कमिट्या स्थापन केल्या तेव्हां ब्रम्हदेशांतहि एक कॉंग्रेस कमिटी स्थापन झाली होती. पण ब्रम्ही जनतेंत कॉंग्रेसबद्दल जितका उत्साह व जितकी निष्ठा उत्पन्न

व्हावयास पाहिजे होती तितकी न झाल्यामुळें तेथें काँग्रेसच्या कार्याचा प्रचार बेतानेंच झाला. आणि त्यामुळेंच कदाचित् ब्रम्हदेशांत काँग्रेसचें एकहि अधिवेशन भरलें नाहीं. वास्तविक ब्रम्हदेश हा हिंदुस्थानाचाच एक भाग व तेथें काँग्रेसची शाखा काम करीत असतां रंगून येथें काँग्रेसचें एखादें वार्षिक अधिवेशन भरावयास हरकत नव्हती.

काँग्रेसनें मात्र आपल्या जन्मापासूनच ब्रह्मदेशाकडे लक्ष पुरविलें. १८८५ सालीं मुंबई येथें भरलेल्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनांत सातव्या ठरावान्वयें ब्रम्हदेश ब्रिटिश साम्राज्याला जोडल्याबद्दल व हा भाग हिंदुस्थानांत सामील केल्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करण्यांत आली. पुढें १९१५ सालीं ब्रम्हदेशाबद्दल पुढील ठराव करण्यांत आला : "ब्रम्हदेश हिंदुस्थानापासून विभक्त व्हावा याबद्दल आज मोठी चळवळ चालू आहे असें आम्हांला दिसतें. काँग्रेसनें आपल्या पहिल्या अधिवेशनांत यासंबंधीं कोणतें मत व्यक्त केलें होतें त्याची या ठिकाणीं आठवण देणें जरूर वाटतें. त्या अधिवेशनांत काँग्रेसनें ब्रम्हदेश ब्रिटिश साम्राज्याला जोडल्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली होती. आज या ठरावान्वयें ब्रम्हदेश हा हिंदुस्थानापासून विभक्त करण्यांत यावा व सिलोनप्रमाणें 'क्राऊन कॉलनी' म्हणून त्याला स्वतंत्र घटना देण्यांत यावी अशी मागणी करण्यांत येत आहे."

१९०८ सालच्या काँग्रेसच्या घटनेंत ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत ब्रम्हदेशाला दोन जागा देण्यांत आल्या होत्या. त्या वेळीं मुंबई व मद्रास यांचे प्रत्येकीं १५ प्रतिनिधि होते. पुढें ही संख्या लोकसंख्येच्या प्रमाणांत वाढविली गेली. १९२१ सालीं जेव्हां

काँग्रेसनें हिंदी राष्ट्राची भाषावार प्रांतरचना ठरविली तेव्हां काँग्रेसच्या २१ प्रांतांपैकीं ब्रम्हदेश हा एक प्रांत मानण्यांत आला होता व त्याला आठवें स्थान मिळालें होतें. ब्रम्हदेशाच्या विभक्तीकरणाला काँग्रेसनें पाठिंबा दिला होता पण ती चळवळ ब्रम्ही लोकांनीं नेटानें केल्यामुळें काँग्रेसचे ठराव, गोलमेज परिषद् इत्यादिकांचा परिणाम होऊन १९३५च्या कायद्यान्वयें ब्रम्हदेश हिंदुस्थानपासून विभक्त करण्यांत आला. पण प्रत्यक्ष विभागणी ता. १ एप्रिल १९३७ रोजीं अंमलांत आली. तेव्हांपासून ब्रम्हदेश विभक्त झाला खरा, पण ब्रिटिश अंमलाखालींच राहिला.

ब्रम्हदेश अलग झाल्यावर हिंदुस्थानाप्रमाणें तेथें पहिलें मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. प्रारंभींचे पुढारी सरकारनिष्ठ, मोठमोठ्या सरकारी पदव्या धारण करणारे व वरिष्ठ वर्गांतले होते. त्यामुळें तेथें काँग्रेसप्रमाणें जनतेचें सरकार स्थापन झालें नाहीं. १९४१ सालीं जपाननें ब्रम्हदेशावर आक्रमण करीपर्यंत ब्रम्हदेशांत जरी सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट असे विशिष्ट राजकीय पक्ष होते तरी सबंध देशाचा सुसंघटित असा पक्ष नव्हता. यु सॉ, डॉ बॉ मा, यु टिन टट् इत्यादि नांवें १९४२ सालापूर्वीं प्रामुख्यानें ऐकूं येत असत. यु सॉ हे दोन वेळ मुख्य प्रधान होते. ब्रम्हदेश विलग झाला तरी त्याला स्वायत्ततेचा हक्क मिळाला नसल्यामुळें या हक्काची शाबिती करण्यासाठीं मुख्य प्रधान यु सॉ हे आपले चिटणीस यु टिन टट् यांच्यासह १९४१ च्या आक्टोबरमध्यें इंग्लंडला गेले होते. चर्चिल-रूझवेल्टप्रणित अटलांटिक सनदेंतील स्वयंनिर्णयासंबंधींचें तत्त्व ब्रम्हदेशाला लागू करण्यांत यावें यासाठीं खटपट करावी हाहि या लंडनयात्रेचा त्यांचा हेतु होता. इंग्लंडमध्यें

त्यांना भारतमंत्र्यांनीं मेजवानी दिली. लंडनमधल्या मुलाखती आटोपून ते रूझवेल्टला भेटण्यासाठीं अमेरिकेंत गेले. तेथून पॅसिफिकच्या मार्गानें आपल्या देशांत परत येण्याचा त्यांचा हेतु होता; पण जपाननें युद्ध पुकारल्यामुळें होनोलुलूहून त्यांना परतावें लागलें व ते लंडनला दाखल झाल्यावर जपानशीं संबंध ठेवल्याच्या आरोपावरून १९४२ च्या जानेवारींत त्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें. पुढें त्यांची युगांडा येथें रवानगी झाली. युद्ध संपल्यावर १९४५ अखेर त्यांची मुक्तता झाली.

* * *

जपानचें युद्ध संपल्यावर जपानचा पाडाव करण्याच्या कामीं ज्यांनीं दोस्त राष्ट्रांना मदत केली त्यांच्या हातीं ब्रम्हदेशाचा कारभार सोंपविण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें व हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें मध्यवर्ती तात्पुरतें सरकार व घटनापरिषद् या गोष्टी ब्रिटिश सरकारनें मान्य केल्या त्याप्रमाणेंच ब्रम्हदेशांतहि कबूल केल्या. ब्रिटिश सरकारच्या घोषणेप्रमाणें ब्रम्हदेशांत १९४६ च्या नोव्हेंबर महिन्यांत तात्पुरत्या सरकारचे प्रमुख म्हणून जनरल ऑंगसान यांची नेमणूक झाली. त्यानंतर ब्रम्हदेशाच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं १९४७ च्या जानेवारींत ब्रम्ही शिष्टमंडळाला पाचारण केलें. त्यावरून मुख्य प्रधान जनरल ऑंगसान, माजी मुख्य मंत्री यू सॉ प्रभृतींचें शिष्टमंडळ ता. १० जानेवारी रोजीं इंग्लंडला रवाना झालें. वाटेंत दिल्ली येथें ता. ३ रोजीं मुख्य प्रधान पं. जवाहरलाल यांनीं जनरल ऑंगसान यांचें स्वागत करून दिल्ली रेडियोवर त्यांचें भाषणहि करविलें.

लंडनला गेल्यावर जनरल ऑंगसान व ब्रिटिश मंत्रिमंडळ यांच्या वाटाघाटी होऊन एक मसुदा तयार करण्यांत आला व त्यावर सर्वांच्या सह्या झाल्या. यू सॉनें मात्र या लंडन करारावर सही करण्याचें नाकारलें. त्याचें म्हणणें असें कीं ह्या करारानें खरें स्वातंत्र्य मिळणार नाहीं; फक्त डोमियन स्टेटस ऊर्फ वसाहती स्वराज्य मिळेल. तो पूर्वीपासूनच ऑंगसॉनचा विरोधक होता. ऑंगसान हा ब्रिटिशांच्या हातांतलें बाहुलें आहे असें तो म्हणत असे.

### जनरल ऑंगसान

युद्धापूर्वी ऑंगसानचें नांवही कोणीं ऐकलें नव्हतें व पहिल्या ब्रम्ही मंत्रिमंडळांत मुख्य प्रधान होणारा हा तरुण गृहस्थ त्या वेळीं अवघा ३२ वर्षांचा होता. त्यानें अँटीफॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग (फॅसिस्टविरोधी जनतास्वातंत्र्य संघ) या नांवाचा एक पक्ष काढला होता व त्याला थोड्याच काळांत हजारों अनुयायी मिळाले. त्यानें सरकारी नोकर, विद्यार्थी, शिक्षक, पोलिस, इत्यादिकांचे संप घडवून आणून पुढारीपण मिळविलें होतें. त्याला 'बोगयोक' ऊर्फ पुढारी असें प्रेमानें म्हणण्यांत येत असे हिटलरला ज्याप्रमाणें फ्यूरर, मुसोलिनीला डयूस असें म्हटलें जात असे त्याच पद्धतीची ही ऑंगसानची पदवी होती. अनेक ब्रम्ही पुढाऱ्यांप्रमाणें तो एके काळीं जपानचा पुरस्कर्ता व कैवारी होता. पण पुढें त्याचा भ्रमनिरास झाल्यावर जपानला विरोध करण्यासाठीं व त्याच्या ताब्यांतून ब्रम्हदेश हिसकावून घेण्यासाठीं तो ब्रिटिश सैन्यांत दाखल झाला. जपानचा पक्षपाती म्हणून १९४० सालीं ब्रिटिश सरकारनें त्याला पकडण्याचें ठरविलें त्या वेळीं तो टोकियोंत पळाला. तेथें त्याला जपान्यांनीं मेजर-जनरल करून ब्रिटिशांशीं लढणाऱ्या ब्रम्ही संरक्षक

सैन्याचें आधिपत्य दिलें. कांहीं महिने जपानी अधिकारी त्याच्यावर खूप होते व त्याला ' ऑर्डर ऑफ दि रायझिंग सन ' ( उगवत्या सूर्याचा मान ) देण्यांत आला. थोड्याच दिवसांत जपान्यांच्या विषयीं त्याच्या मनांत संदेह उत्पन्न झाला व जपान्यांच्याकडून ब्रम्ह-देशाला कदापिही स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें. त्याबरोबर तो जपानची बाजू सोडून आग्नेय आशिया सैन्याचे अधिपति ॲड्मिरल माउंटबॅटन यांना जाऊन मिळाला. आणि तेव्हांपासूनच त्याच्या आणि ब्रम्हदेशाच्या उत्कर्षास सुरवात झाली.

जनरल ऑंगसान यांचा जन्म ब्रम्हदेशांत येनान युआंग या गांवीं झाला व तेथेंच त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण झालें. १९३३ मध्यें ते रंगून विद्यापीठांत दाखल झाले. कॉलेजमध्यें असतांना विद्यार्थिसंघटनेचे व चळवळीचे ते पुढारी होते व त्यांनीं १९३६ सालीं विद्यार्थ्यांचा प्रचंड संप घडवून आणला. राजकारणांत पडण्यासाठीं त्यांनीं कायद्याचा अभ्यास अर्धवट सोडून दिला व ब्रिटिश सरकारविरुद्ध ठिकठिकाणीं संप सुरू केले. त्यांच्या या देशव्यापी संपांचा इतका परिणाम झाला कीं देशाचीं राज्यसूत्रें त्यांच्या हातीं देणें ब्रिटिशांना भाग पडलें. जनरल ऑंगसान यांचें खाजगी सैन्य सुमारें १५००० होतें व त्यांचा जनता-स्वातंत्र्य-संघ सबंध देशांत सर्वांत मोठा, अधिक संघटित व प्रबळ होता. त्यामुळें ब्रिटिश सरकारला त्यांचें महत्त्व कळून चुकलें होतें. अशा स्थितींत १९४६ सालीं गव्हर्नरच्या सल्लागार समितीचे उपाध्यक्ष नेमण्याचा प्रश्न जेव्हां उपस्थित झाला तेव्हां त्यांच्याशिवाय दुसरा कोणताहि लायक माणूस सबंध ब्रम्हदेशांत नव्हता. त्यामुळें त्यांची नेमणूक होणें अपरिहार्य होतें.

अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यांत जनरल ऑंगसान यांनीं जी तेजस्वी व लोकोत्तर कामगिरी केली त्यामुळें ब्रम्हदेशाच्या इतिहासांत त्यांचें नांव चिरस्मरणीय झाल्याशिवाय रहाणार नाहीं. ब्रम्ही जनता त्यांना 'स्वातंत्र्यवीर' म्हणत असे. आपल्या देशाची पारतंत्र्यांतून मुक्तता करणाऱ्या या वीरश्रेष्ठाला प्रतिस्पर्ध्यांकडून विश्वासघाताचें मरण आलें याबद्दल कोणालाहि खेदपूर्वक संताप आल्याशिवाय रहाणार नाहीं. यु ऑंगसान हे राष्ट्रीय सरकारचे प्रमुख झाले व त्यांच्याच प्रेरणेनें ब्रम्ही घटनापरिषदेचें कार्य जोरानें सुरू होऊन ब्रम्हदेशाच्या भावी घटनेचा पाया घातला गेला. हें महत्कार्य त्यांच्या कित्येक प्रतिस्पर्ध्यांना पाहवलें नाहीं म्हणून त्यांनीं मारेकऱ्यांकडून त्यांचा खून करविला.

ऑंगसान हा दिसावयाला सर्वाधिकाऱ्यासारखा दिमत नसला तरी तो तत्त्वनिष्ठ व खंबीर होता. तसेंच तो व्यापक दृष्टीचा मुत्सद्दी होता. आपल्या देशाचें भवितव्य आपलें आपणच ठरविलें पाहिजे हें ध्येय त्याच्या डोळ्यांपुढें होतें म्हणून ब्रम्हदेशाच्या होऊं घातलेल्या घटनेंत देशांतली शेतजमीन, जंगलें, खाणी, रेल्वे इत्यादिकांचें राष्ट्रीयकरण करावें अशी योजना त्यानें आंखली होती. समाजवादानेंच देशाची सर्वांगीण प्रगति होईल अशी ऑंगसानची दृढ श्रद्धा होती. ब्रम्ही घटनापरिषदेनें ब्रम्हदेशाचा नवा राष्ट्रध्वज व नवें राष्ट्रगीत ठरविलें आहे. त्याचप्रमाणें जनतास्वातंत्र्यसंघानें मान्य केलेली भावी घटनाही घटनासमितीनें एकमतानें मंजूर केली आहे. ही घटना युगोस्लाविया, ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका, दक्षिण आफ्रिका व लिथुआनिया या देशांच्या घटनांच्या अनुरोधानें तयार केली असल्यामुळें ती प्रगतिपर व दूरदृष्टीची

असेल हें सांगावयास नकोच. या नव्या घटनेंत प्रेसिडेंट ऊर्फ राष्ट्रपति याची योजना केली असून त्याच्या खालोखाल पण खरा राष्ट्रकार्याध्यक्ष म्हणून मुख्य प्रधान येतो. हें स्थान विभूषित करण्याचा पहिला अभूतपूर्व मान जनरल ऑंगसान यांना मिळणार होता. पण राष्ट्राचें दुर्दैव !

' थ्रोगयोक ' ला अनेक शत्रू होते. राजकीय क्षेत्रांत तर अनेक होते, पण धार्मिक बाबतींतही फुंगी त्याच्या प्रतिपक्षांत जमा झाले होते. फुंगींनीं राजकारणापासून दूर रहावें व बुद्धधर्म हा सरकारी धर्म होऊं शकणार नाहीं असें त्यानें स्पष्ट सांगितलें होतें. त्यामुळें बुद्ध भिक्षु व धर्मगुरु फुंगी यांचा त्याच्यावर रोष होता. ब्रम्हदेशांत फुंगींचें एवढें प्रस्थ आहे, कीं राजकीय पुढाऱ्यांच्या बरोबरीनें त्यांना मानण्यांत येतें.

यु सॉ व डॉ. बा मा या दोन माजी मुख्य प्रधानांशिवाय थाकिन थान टन व थाकिन् सो हे दोन कम्युनिस्ट पुढारी आणि यु बा सेन हा जहाल प्रागतिक हे सर्वजण ऑंगसानचे प्रतिस्पर्धी होते. या सर्वांत जास्त शत्रुत्व यु सॉनें केलें. कारण त्यानेंच जनरल ऑंगसान व त्याचे सात मंत्रि यांचे खून करविण्याचें दुष्ट कारस्थान रचलें.

गेल्या वर्षी यु सॉच्या गाडीवर कोणींतरी गोळ्या झाडल्या होत्या. एक समोरच्या कांचेला लागून त्याच्या तोंडावर लहानशी जखम झाली होती. ऑंगसानचेंच हें कृत्य आहे, तोच आमच्या जिवावर उठला आहे, असा त्यानें जाहीर आरोप केला व रंगूनपासून सात मैलांवर एका तलावाकांठीं असलेल्या आपल्या किल्लयासारख्या बंदिस्त बंगल्याभोंवतीं सशस्त्र पहारेकरी नेमले. ऑंगसानच्या विरुद्ध यु सॉ

मनांतल्या मनांत अतिशय जळफळत होता. त्याचा स्फोट ता. २४ जुलै १९४७ रोजीं दुपारीं झाला.

त्या दिवशीं दुपारीं पांच वाजतां एक हिरवी जीप गाडी रंगून सेक्रेटरीएटमध्यें दाखल झाली. तिला नंबर नव्हता. आंतल्या बाजूस ब्रम्ही सरकारच्या मंत्रिमंडळाची बैठक चालू होती. इतक्यांत गाडींतून चौघेजण उतरले. त्यांनीं ब्रम्ही लष्करी पोशाख धारण केला होता. तिघांच्याजवळ स्टेन गन्स होत्या. कौन्सिलच्या दाराजवळ येतांच एकानें पहारेकऱ्याला ढकललें व दुसरा आंत घुसला. समोरच्या खोलींत एका टेबलाभोंवतीं ब्रम्हदेशाचें तात्पुरतें मंत्रिमंडळ बसलें होतें. दारांतून आंत घुसतांच स्टेन गन्समधून त्या चौघांनीं गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. बहुतेक मंत्र्यांच्या छातींत गोळ्या लागल्या. सहाजण तेथल्या तेथें ठार झाले. दोघांना प्राणांतिक जखमा झाल्या. मारेकऱ्यांनीं आपलें काम केल्यावर ते शांतपणें इमारतींतून बाहेर पडले व अगदीं हळूहळू मोटार चालवीत निघून गेले. जणूं त्यांना कसलीच घाई नव्हती.

अत्याचारी माथेफिरूंनीं ऑंगसानवर खुनी हल्ला केल्याचें पोलिसांना समजतांच त्यांनीं तावडतोब यु सॉच्या घरावर धाड घातली. पण यु सॉच्या लोकांनीं घरांतूनच पोलिसांवर गोळ्या झाडून त्यांच्याशीं दोन हात करण्यास सुरवात केली. अखेर यु सॉला व त्याच्या एकोणीस साथीदारांना गिरफदार करण्यांत आलें. पोलिसांना त्याच्या बंगल्यांत हिरवी जीप गाडी, ब्रेन गन्स, स्टेन गन्स, हातबॉंब व इतर बराच दारूगोळा सांपडला. कडक पोलिस पहाऱ्यांत यु सॉला रंगूनच्या मुख्य तुरुंगांत नेण्यांत आलें. हा खुनी खटला बरेच दिवस चालून ता. ३१-१२-४७ रोजीं त्याचा निकाल

लागला. यु सॉ व त्याच्या आठ साथीदारांना फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली.

ऑंगसान प्रभृतींचें अखेरचें दर्शन घेण्यासाठीं रंगूनच्या व्हिक्टोरिया ज्युबिली हॉलमध्यें लाखों लोक येऊन गेले. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर दुःखाची छटा दिसत होती. ब्रम्हदेशांत अलीकडे जे अनेक पुढारी होऊन गेले त्यांत ऑंगसानला अभूतपूर्व लोकप्रियता मिळाली तशी दुसऱ्या कोणासही लाभली नाहीं.

ऑंगसान प्रभृतींचे खून ही कितीही शोचनीय घटना असली तरी तिच्यामुळेंच ब्रम्ही स्वातंत्र्याची मंगल घटका जवळ आली असें ॲन्ड्र्यू रॉथ या लेखकाचें म्हणणें आहे. तो म्हणतो, "ऑंगसानचा व त्यांच्या सहा सहकाऱ्यांचा अमानुष रीतीनें खून झाला, या दुर्दैवी घटनेनें ब्रम्ही राष्ट्राची झालेली तात्कालिक हानि कितीही मोठी असली तरी त्याचे दूरगामी परिणाम मात्र मांगल्यसूचक ठरले आहेत. ऑंगसान अगदीं कीर्तिशिखरावर पोंचले असतांना त्यांच्या शरीरांत मारेकऱ्यांच्या गोळ्या घुसल्या, पण अशा रीतीनें त्यांचें जें रक्त सांडलें तें ब्रम्ही स्वातंत्र्याच्या वृक्षाला पोषकच ठरलें आहे... ऑंगसानच्या खुनामागें आपले हात होते हा आरोप टाळण्याकरितां कां होईना ब्रिटिश सरकारला आतां ४ जानेवारी १९४८ या दिवशीं ब्रम्हदेश पूर्ण स्वतंत्र होईल असें जाहीर करणें भाग पडलें. ऑंगसानची मनीषा अशा रीतीनें पूर्ण होत आहे.

ऑंगसानच्या मागून त्याचा उजवा हात थाकिन नू याची पक्षनेता व मुख्य प्रधान म्हणून एकमतानें नेमणूक झाली. तो सुद्धां तरुणच म्हणजे चाळिसाच्या आंतच आहे. इतर मंत्रीहि तरुण

आहेत. ऑंगसानच्या मृत्यूनें जनतेला जबर धक्का बसला असला तरी त्याचा उपयोग नवी राजवट लोकानुवर्ती होण्याच्या कामी होईल यांत शंका नाहीं. ब्रम्ही घटनापरिषदेचे अध्यक्ष यु म्या, प्रमुख राजकीय कार्यकर्त्या डाम्या सेन, लंडनमधील ब्रम्ही हाय-कमिशनर यु टिन टट् इत्यादि नांवें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

ब्रम्हदेशाचें भवितव्य आतां निश्चित झालें आहे. समाजवादी सार्वभौम संघराज्य हें त्याचें ध्येय ऑंगसानच्या जनता-स्वातंत्र्य-पक्षाकडून व पंतप्रधान थाकिन नू यांच्या नेतृत्वाखालीं यशस्वीपणें सिद्धीस जाईल असा भरंवसा वाटतो.

ब्रम्ही स्वातंत्र्याचा विजय असो !

## साभार निर्देश

ह्या छोट्या पुस्तकासाठीं बर्मा पॅम्फलेट्स् (ब्रर्मा रीसर्च सोसायटी), व्हॉट हॅपन्ड इन् बर्मा (एम्. थाइन पे), कॉंग्रेसचा इतिहास (डॉ. पट्टाभी), हाचिनसन्स हिस्टरी ऑफ नेशन्स्, ग्लिम्सेस ऑफ वर्ल्डस् हिस्ट्री (पं. जवाहरलाल नेहरू), इंडिया, टाइम, लाइफ, इलस्ट्रेटेड, इत्यादि देशी-परदेशी नियतकालिकांचे अंक वगैरेंचा जो भरपूर उपयोग झाला त्याचा या ठिकाणीं साभार निर्देश केला पाहिजे. —लेखक.

# अभिवादन !

" स्वातंत्र्याच्या नव्या युगांत पाऊल टाकतांना ब्रम्हदेश सबंध जगाला अभिवादन करीत आहे. या नव्या राजघटनेबद्दल आम्हांला अत्यानंद होत आहे आणि बाकीचें जगही आमच्या आनंदांत भागीदार आहे हें पाहून आमचा आनंद दुणावत आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ज्या देशभक्तांनीं व हुतात्म्यांनीं आत्मबलिदान केलें त्यांचें प्रथम आदरपूर्वक स्मरण करणें हें आमचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें आमचें ध्येय जलद रीतीनें आणि शांततेनें साध्य करण्यास ज्यांनीं मदत केली त्या ब्रिटिशांचेही आम्हांला आभार मानले पाहिजेत. जागतिक शांततेच्या कार्यांत भाग घेण्यासाठीं व सर्वांबरोबर स्नेहाचें संबंध ठेवण्याच्या दृढ निश्चयानें आम्ही स्वतंत्र राष्ट्रांच्या समूहांत पदार्पण करीत आहों. "

—साओ श्वे थाइक

[ लोकसत्ताक ब्रम्हदेशाचे पहिले अध्यक्ष ]

# शुभेच्छा-संदेश

" ब्रम्हदेशाचें स्वातंत्र्य ही घटना आशियाच्या दृष्टीनें महत्त्वाची असली तरी हिंदुस्थानाच्या दृष्टीनें अधिकच आहे. ब्रम्ही स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला याबद्दल हिंदी जनता आणि हिंदुस्थान सरकार यांच्या वतीनें मी मन:पूर्वक समाधान व्यक्त करतों. प्राचीन काळीं हिंदुस्थान व ब्रम्हदेश यांचे निकटचे संबंध होते. ते यापुढें अधिक घनिष्ठ होतील याबद्दल मला संशय वाटत नाहीं. आमच्या परस्परांबाबतच्या सुहृद्भावनेनें आम्ही जवळ येऊंच, पण त्याहीपेक्षां जागतिक घडामोडीमुळें आमचे हितसंबंध अधिकाधिक निकटचे होतील. आमचें सहकार्य वाढविण्यासाठीं आम्हांला नवीन मार्ग लवकरच उपलब्ध होतील अशी मला खात्री वाटते. हिंदी देशाच्या सदिच्छा व सुहृद्भाव स्वतंत्र ब्रम्हदेशाच्या पाठीशीं आहे. ब्रम्हदेशाची प्रगति व भरभराट होवो. "

—पं. जवाहरलाल नेहरू

[ हिंदुस्थान सरकारचे पहिले पंतप्रधान ]

29004
प्रा. वा.
9960
3713197

# — शिरीष माला —

**अल्प किंमतींत महत्त्वाच्या विषयांवरील पुस्तकें प्रकाशित करणारी एकमेव माला**

१ गांधी-जीना-पत्रव्यवहार — पृष्ठें ५१ किंमत ८ आणे

२ कस्तुरबा — पृष्ठें ४६ किंमत ६ आणे

३ लिली-मोगरा — पृष्ठें ५६ किंमत ८ आणे

४ ज्ञानतुषार — पृष्ठें ३२ किंमत ६ आणे

५ अमर चीन — पृष्ठें ४८ किंमत १० आणे

६ सोव्हिएट राष्ट्रें व लोक — पृष्ठें ५९ किंमत १० आणे
सोव्हिएट रशियामध्यें अल्पसंख्याकांचा प्रश्न कसा यशस्वीपणानें सोडविला आहे याचें थोडक्यांत दिग्दर्शन.

७ हिंदी स्वातंत्र्याच्या योजना — पृष्ठें ६६ किंमत १२ आणे
क्रिप्स योजनेपासून तों हिंदी स्वातंत्र्याच्या बिलापर्यंत सर्व स्वातंत्र्याच्या योजना एकत्रित केल्या आहेत.

८ दिल्ली येथील स्वातंत्र्योत्सव — पृष्ठें २२ किंमत ८ आणे
स्वतंत्र भारताच्या राजधानींत स्वातंत्र्यदिनाचे दिवशीं झालेल्या सोहोळ्याचें अविस्मरणीय वर्णन ( अनेक चित्रें ).

९ हरिजन संत — पृष्ठें ४४ किंमत ८ आणे
( पांच हरिजन संतांचा परिचय )

१० क्रांतीच्या ज्वाला — पृष्ठें ८० किंमत १२ आणे
भारतीय स्वातंत्र्य-संग्रामांतील क्रांतिकारकांच्या कार्याचें धांवतें समालोचन.

**शिरीष मालेंतील सर्व पुस्तकें एकदम मागविणारास पोस्टखर्च माफ.**

आमची नवी पुस्तकमाला

# "आमचे शेजारी"

स्वतंत्र भारताच्या शेजारी राष्ट्रांची सर्व दृष्टींनीं माहिती असणें आज प्रत्येक नागरिकाला आवश्यक आहे. या दृष्टीनें आपल्या शेजारी राष्ट्रांची अगदीं थोडक्यांत ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक व राजकीय साधार व सचित्र माहिती देणारी ही छोटी पुस्तकमाला आम्हीं योजिली आहे.


प्रत्येक पुस्तकांत सुमारें पन्नास ते साठ पानें मजकूर, दोन नकाशे व अनेक चित्रें देण्यांत येतील.

या मालेंतील पुढील पुस्तकें दर महिन्यास साधारण दोन प्रमाणें प्रकाशित होतील.

चित्रशाळा प्रकाशन

पुणें २.


अनुक्रम 20006
विभाग भा. वा
क्रमांक 9960
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
ना. क. 20६६ नों. दि
भा. वा. क.
IRBK-0102768
IRBK-0102768



चुकिंग
फोर्टहर्ट्स
युंगनिंग
ची न
मिटकिना
मोगौंग
शिलाँग
हिंदुस्तान
युनान
भामो
लँशिओ
मंडाले
कलकत्ता
चितगांव
टौंगी
हनोई
अक्याब
चेंगमे
टौंगू
रंगून
बसीन
मोलमेन
स या म
बँकोक
टेव्हाय
मर्गी
पोर्टब्लेअर
सायगांव
स या म चें आखात
निकोबारबेटे
कुटाराजा
पेनांग
मलाय
क्वालालंपूर